१४ लवादाचें काम संपल्यानंतर अखेर ठराव होईल, त्याजवर अनुकूल पंचानीं सह्या कराव्या. व पक्षकार राजी असल्यास त्यांच्याही सह्या घ्याव्या. अस्सल ठराव दप्तरीं ठेवावा. त्याच्या नकला पक्षकारांनीं मागितल्यास तत्काळ (ज्या वेळेस जो स्वांपाचा कायदा चालू असेल त्यांतील ठरावाप्रमाणें) द्याव्या. आणि त्याजवर अखेर ठराव करणारे अनुकूल पंचांनीं सह्या कराव्या. नंतर करारनाम्यांत दर्शविलेल्या कामाचा निकाल झाला असें समजावें.

१५ काम चालविणारे सभासदांचे रोजचें काम चालविण्याबाबद व कागद पत्र ठेवण्याबाबद नमुने व नियम ठरविण्याचा अगर बदलण्याचा अधिकार पोटसभेस आहे, परंतु या सभेच्या वेळेस निदान दहा तरी सभासद हजर असावेत.

१६ काम चालविणारे सभासदांपुढें चाललें काम त्यांच्यानें शेवटास नेववत नसल्यास पोटसभेपैकीं जास्ती सभासद मदतीस घेऊन तें काम शेवटास नेण्याचा अधिकार काम चालविणारे सभासदांस आहे. अगर आठवड्या-
गांवांत अगर बाहेर तीन कोसपर्यंत न: नऊ कोस
सपर्यंत ।: पुढें दर कोसास अगर त्याच्या भाग
स ।- या प्रमाणानें द्यावा परंतु मनुष्य हजर

च्या समोर सोंपविण्याचा त्यांस अधिकार आहे.

**सभेचें उत्पन्न.**

९ प्रत्येक सभासदानें सभेचे खर्चाकरितां दर वर्षास निदान चार आणे दिले पाहिजेत. ते वार्षिकसभेचे वेळेस अगर पुढें एक महिना पर्यंत कोणतेही वेळेस मुख्य सभेचे चिटणिसांपाशीं द्यावेत. त्याजबद्दल पावती चिटणिसांनीं द्यावी. ज्यांची खुषी आपले योग्यतेप्रमाणें द्रव्यद्वारा या सभेस जास्ती मदत देण्याची इच्छा असेल तर त्यास हरकत आहे असें समजूं नये. चिटणिसांजवळ वर्गणीची व मदतीची रकम जमेल त्याची तपशीलवार यादी तयार करून खजिनदार यांजकडे ती जमा होण्याकरितां दररोज यादीसहित पाठवावी.

२ पक्षकारांकडून खर्चाकरितां रकम येईल ती दररोज चिटणिसांनीं खजिनदारांकडे जमा होण्याकरितां तपशीलवार यादीनें पाठवावी. या सभेचा खर्च चालविण्याकरितां सभासदांशिवाय दुसरे कोणी कांहीं रकम बक्षीस दिली तर ती या सभेच्या कोणत्याही चिटणिसांनीं घेऊन सभेचे खजिनदारांकडे जमा होण्याकरितां तत्काळ पाठवावी. जी जी रकम खजिनदार यांजकडे जमा होण्याकरितां येईल, त्याचा दाखला खजिनदारानें आपल्या सहीनिशीं ज्या कामदाराकडून रकम जमा होण्याकरितां आली त्यास देत जावा. जी रकम सभेकरितां कोणीही मनुष्य देईल त्यास पावती देणें हें चिटणिसांचें काम आहे.

**नियम बदलणें अगर वाढविणें.**

१० योग्य वाटल्यास नियमांत बदल करण्याचा अगर वाढविण्याचा अधिकार मुख्य सभेस आहे. नवे नियम मंजूर होईतोंपर्यंत जुने नियमाप्रमाणें काम चालेल. कोणतेंही काम चालू असलेले नियमाप्रमाणें झालेलें असेल तें बदललें जाणार नाहीं.

**शपथ.**

११ प्रत्येक सभासदानें, सभासद होतेवेळीं सभेचें काम योग्य रीतीनें चालविण्याकरितां आपले धर्माप्रमाणें शपथ घ्यावी, आणि शपथेचे कागदावर सही करावी. नवीन सभासद को-

णी झाल्यास त्यांणीं आपले धर्माप्रमाणें मुख्य सभेपुढें शपथ घ्यावी. सभेच्या प्रत्येक कामदारानें आपलें काम योग्य रीतीनें चालविण्याकरितां नेमणूक होते वेळीं मुख्य सभेपुढें शपथ घ्यावी. पंच नेमले गेल्यावर त्यांणींही आपलें लवादाचें काम चालविण्याकरितां आपले धर्माप्रमाणे पोटसभेपुढें शपथ घ्यावी.

१२ कोणतेंही सभेचें काम चालेल त्यासमयीं सर्वांस येण्याचा अधिकार आहे. परंतु ज्या गोष्टीसंबंधीं विचार केला जाईल, सभेचे परवानगी शिवाय कोणतेंही मनुष्यास त्या ठिकाणीं बोलण्याचा अधिकार नाहीं. — सभेंत मोकळीक, विशेष ठराव.

१३ या सभेंत कामचालविण्याचे जे चालू असलेले कायद्यानें मना केलेले मात्र चालणार नाहीं. — अनाधिकार.

१४ या सभेस नादपेड पत्र पाठविलें असतां घेतलें जाणार नाहीं. मुख्य सभेच्या चिटणिसाचे सहीनें पत्रव्यवहार व मुख्यसभेचें दप्तर ठेवलें जाईल. — पत्रव्यवहार.

१५ प्रत्येक सभेचे अधिकारी हे त्या त्या सभेचे सभासद समजले जातील. त्यांचीं मतें सभेंत गणतील. सभेचा कोणी अधिकारी अगर सभासद आपलें हुद्याचें काम चालविण्यास नाखुषी दर्शवील तर त्याचा राजीनामा मुख्य सभेपुढें घेतला जाईल. राजीनाम्याचे कारणाचा विचार करण्याचा अधिकार पूर्णपणें सभेस आहे. — हुद्देदारांचे मत व राजीनामा.

१६ मुख्य सभेस जरूर वाटल्यास ठिकठिकाणीं या सभेची पोटशाखा म्हणून स्थापली जाईल. त्या सभेनें होईल तितकें या सभेचे नियमाप्रमाणें काम चालवावें. त्या सभेचें सर्व दप्तर साल अखेरीस या सभेकडे पाठवावें; परंतु जरूर वाटल्यास त्या सभेचें दप्तर त्या ठिकाणीं ठेवण्याचा अधिकार मुख्य सभेस आहे. — पोटशाखा

दुसऱ्यास-भेशीं संबंधजोडणें.

१७ कोणत्याही ठिकाणीं कोणतीही सभा स्थापली गेली असल्यास त्या सभेस या सभेची मदत घेण्याची अगर ती सभा या सभेस जोडण्याची इच्छा असल्यास त्या प्रमाणें करण्याचा व तत्संबंधी विचार करण्याचा अधिकार मुख्य सभेस आहे.

सभासदां-समनाई.

१८ या सभासदांपैकीं कोणी सभासद, त्याच्या पुढें चालणारे कामांतील पक्षकारांचा नातलगपणाचा अगर धनी चाकरपणाचा अगर वादी प्रतिवादीचा अगर दुसरा हरएक प्रकारचा संबंध असल्याची खबर पक्षकार देईल तर त्यांस मना करण्याचा अधिकार प्रसंगा प्रमाणें मुख्य सभेस अगर पोटसभेस आहे. जरूर असल्यास त्याच्या बदला काम चालविण्याकरितां दुसरा सभासद सभेंत असलेले सभासदांपैकीं नेमावा.

सभेचा अर्थ व मर्यादा.

१९ या नियमांत मुख्यसभा व पोटसभा शब्दाचा अर्थ " कसबे इंदापूर येथील ऐक्यवर्धक सभा " असा समजावा. व या सभेस ज्या प्रदेशांतील पक्षकारांची या सभेचे हातून काम चालविण्याची इच्छा असेल, तो सर्व प्रदेश या सभेची मर्यादा आहे असें समजावें.

सभेचे आज्ञेवरून,

**मुख्यसभेचे चिट[णी]**

**स.**

## नमुना (अ) कलम ७ प्रमाणें.

राजमान्य राजश्री अ-क व ख-ग व घ-ङ राहणार ——— यांस.
आम्ही खालीं सही करणार उभयपक्षकार लिहून देतों जे, आम्हा उभयतांमध्यें (येथें जो तंटा असेल तो जितका स्पष्ट लिहवेल तितका लिहावा) तंटा आहे. तो आम्हा उभयतांचे विचारें निकाल होत नाहीं. करितां आम्ही उभयतां ह्या तंट्याचा निकाल करण्याकरितां आपणांस लवाद करण्याकरितां पसंत केलें, व नेमिलें आहे. तरी सदरहू तंटयाचा निकाल जो सर्व एक मतानें अगर बहुमतानें आपण कराल, तो आम्हा उभयतांस मान्य आहे. व ज्या प्रमाणें निकाल कराल त्या प्रमाणें वर्तणूक करण्यास आम्ही अंतःकरणपूर्वक राजी आहोंत. दस्तुर.

साक्ष.
१ ———————
१ ———————

या गोष्टीचे साक्षीकरितां आम्ही आपल्या सह्या मिती ——— रोजीं केल्या आहेत.

---

## नमुना (क) कलम ८ प्रमाणें.

आजमिती रोजीं अ-क-ख वगैरे राहणार ——— असे पंच एकत्र होऊन पक्षकार त-प व प-फ- यांचा दरम्यान (येथें करारनाम्यांत जी तंट्याची हकीकत असेल ती सर्व लिहावी.) गोष्टींचा उभयतांच्या तक्रारी व पुरावे पाहून विचार करितां आमचा सर्वांचा (अगर बहुमत असल्यास आपच्या पंचापैकीं अमुक यांचा) नजरेस असें येतें कीं, (त-थ यांणीं प-फ यांच्या विरुद्ध कृत्य करावें अगर करूंनये, व रकम द्यावी, अगर देऊंनये. व या रीतीनें वागावें. अगर वागूंनये जसें असेल तसें) म्हणून ठराव केला असे. मिती मास, शक, ता०

पक्षकार राजी असल्यास त्यांच्या सह्या.

सर्व पंचांच्या अगर बहुमत असल्यास अनुकूल पंचांच्या सह्या.

---

## नमुना (ख) कलम १२ प्रमाणें.

राजश्री अ-क राहणार ——— यांस.
खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं, (येथें पक्षकार यांची

चकरारनाम्याचीसंपूर्णमिती

नावें लिहून त्यांच्या दरम्यान अमुक तंटा आहे. म्हणून स्पष्ट लिहावें) यांची चौकशी अमुक पंचापुढें चालू आहे. ह्या कामांत पक्षकार " त-थ यां-णीं (अगर जसें असेल तसें) सदर्हू पंचापुढें तुमची साक्ष घ्यावी म्हणून क-ळविल्यावरून तुम्ही मिती— रोजीं — वाजतां पंचांपुढें साक्ष देण्या-करितां मेहेरबानीनें यावें. कळावें. मिती

सही सभेचे चिटणीस यांची.

---

# चालू वर्षाकरितां पोरसभा नेमली ती.

कलम ४ र कलम ५ प्रमाणें.

## अध्यक्ष.

रा. रा. बळवंतराव गोपाळ जावडेकर.

## चिटणीस.

रा. रा. पांडुरंग बळवंत महाजन.

रा. रा. गोविंद नरसिंगराव देशपांडे.

## सभासद.

रा. रा. अप्पाजी गोविंद इनामदार.
रा. रा. बाबाजी भीमराव पंडीत.
रा. रा. गंगाधर बजाजी महाजन.
शे. रामदास शेवकराम गुजर.
रा. हरीबा बिन् बापु घासफाटू.
रा. रा. नारायण बल्लाळ जोशी.
रा. मारुती बिन् विठुजी देवकर. माळी.
रा. रा. वासुदेव नारायण पौराणीक.
रा. रा. रंगो सखाराम दुनाखे.
मे. सय्यद आमिनोद्दीन वल्लद सय्यद इमाम नायब काजी.

रा. रा. गोपाळ नरसिंगराव देशपांडे, इंदापूर तालुक्यांतील रयतेचे एजंट मुखत्यार.
रा. रा. अबाजी बहिरव देशपांडे.
रा. रा. बळवंतराव मोरेश्वर.
रा. रा. गोविंद भास्कर गाडगीळ.
रा. रा. माधवराव बहिरव देशपांडे.
रा. रा. वामन गोविंद कुळकरणी, वडेपुरीकर.
रा. गोविंद गोपाळ शेटे.
रा. बापू बिन् महादापा हणपे.

---


समाप्त.

श्री

पुणें सार्वजनिक सभा कचेरी
ता. ३० डिसेंबर सन १८९९

वि० वि० श्रीमंत सरदार बाळासाहेब व तात्यासाहेब नातू यांस सरकारानें अटकेतून मुक्त केल्यामुळें लोकांस होत असलेला आनंद प्रदर्शित करण्याकरिता शहरांतील कांहीं सभ्य गृहस्थांच्या विनंतीवरून रविवार ता. ३१ माहे डिसेंबर सन १८९९इसवि रोजीं ४॥ वाजता पुणे सावर्जनिक सभेच्या नव्या दिवाणखान्यांत **जाहिर सभा** भरविण्यांत येणार आहे. तरी आपण आपल्या इष्टमित्रासह सदर्हू ठिकाणीं सदर्हू वेळीं अवश्य येण्याची कृपा करावी. कळावें हे विनंती.

आपला.

**विनायक रामचंद्र पटवर्धन.**

चेअरमन सार्वजनिक सभा पुणें.

S. M. P. P.

श्री.

रा० रा० सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी
यांस.

श्रीमंत महाराज शिवाजी छत्रपती यांची समाधि मुक्काम रायगड तालुके महाड जिल्हा कुलाबा येथें आहे. या समाधीचा उच्छेद झाला आहे व तिची स्थिति फार शोचनीय आहे. मराठी राज्याच्या मूळ संस्थापकाच्या समाधीची अशी स्थिति असणें ही गोष्ट आपणास मोठी लांछनाची आहे. श्रीमंत शिवछत्रपतीच्या समाधीची कशी स्थिति आहे, याची कच्ची हकीगत ज्ञानप्रकाश व आणखी कांहीं पत्रांत प्रसिद्ध झाली आहे, तेव्हां त्या संबंधानें येथें विशेष कांहीं कळविण्यास नको. या समाधीच्या दुरुस्ती विषयीं काय तजवीज करावी, व सरकारांतून या कृत्यास नेमणूक मुळींच नाहीं, सबब समाधीचा चिरकाळ चांगला बंदोबस्त राहण्याविषयीं काय उपाय योजावे याचा विचार होण्याकरितां शहरवासी लोकांची सभा भरविण्याची कृपा करावी.

ता० २४ मे १८८५.

बाबा महाराज.
रंगराव विनायक पुरंधरे.



बाळासाहेब रास्ते तर्फे
काशिनाथ.
राजे साहेब मालेगांवकर तर्फे
येशवंत सखाराम.
शेखसिरे वांईकर तर्फे गणेश
दिनकर.
बळवंत येशवंत चंद्रचूड.
चिंतामणराव विश्वनाथ नातु.
विनायक वामन रायरीकर.
त्रिंबकराव नारायण राजमाचीकर.
रामदीक्षित आपटे.
चिंतामणराव पांडुरंग फडके.
नारायणराव मुजुमदार.
हरी रामचंद्र देवधर ऊर्फ ढमढेरे.
चिंतो केशव वकील नि० अ-
लिजाबहादर शिंदे.
शिवराम रामचंद्र नातु.
माधवराव येशवंत रास्ते.
दाजीसाहेब नगरकर.
कुशाबानाना लिमये.
दाजी श्रीपत नागपूरकर.
रामचंद्र सदाशिव जोगळेकर.
भाऊ मनसाराम.

श्री

विनंती विशेष. श्रीमंत शिवाजी महाराज छत्रपती यांची रायगड येथें जी समाधि आहे तिचा चिरकाल चांगला बंदोबस्त राहण्याविषयीं काय उपाय योजावे याचा विचार करण्याकरितां शहरवासी लोकांची सभा भरविण्याविषयीं, या सोबतचें सूचनापत्र सभेकडे आल्यावरून सदहू कामाकरितां ता० २८ माहे मे सन १८८५ रोजीं सायंकाळीं पांच वाजतां हिराबाग टाऊनहालमध्यें सभा भरविण्याचा विचार केला आहे, तरी त्यावेळीं सभेस येण्याची मेहेरबानगी व्हावी.

ता० २६ मे सन १८८५.

शिवराम हरी साठे,
शिताराम हरी चिपळूणकर,
सेक्रेटरी सा० स० पुणें.



जोतिराव गोविंदराव फुले.
महादेव मोरेश्वर कुंटे.
महादेव गोविंद रानडे.
वामन महादेव लेले.
वामन शिवराम आपटे.
कृष्णाजी वासुदेव जोशी.
विश्राम रामजी घोले.
सदाशिव रघुनाथ मेडदकर.
गंगारामभाऊ म्हसके.
[illegible]ा रावजी चिपळुणकर.
नारायणभाई दांडेकर.
कृष्णाजी लक्ष्मण नूलकर.

ज्ञानप्रकाश छापखाना पुणें.

रा. रा. नटेश अप्पाजी द्रवीड एम्. ए.
रा. रा. भास्कर कृष्ण कोल्हटकर.
रा. सा. वासुदेव सदाशिव बापट.
रा. रा. प्रभाकर गोविंद वैद्य.
रा. ब. रघुनाथ महादेव केळकर.

---

शके १८१८ सालांत जमा आली ती.

जमा. रुपये.

१७९३०-२ शिल्लक सालगुदस्त.
२२९४-९-६ जमा सालमजकूर
    २९४-१४ वर्गणी
    ७० प्रवेश फी
    ६७३ घरभाडें
    १८८-८ देणगी
    २९९-०-९ व्याज
    १७ सामानविक्री
    ६९२-२-९ त्रैमासिक
    २२९४-९-६
२०२२४-११-६

---

शके १८१८ सालांत खर्च झाला तो.

खर्च रुपये.

८२४ पगार, स्कालर्शीप व पेन्शन.
९०४-१९-९ दुष्काळ एजंटांकरितां वाटखर्ची
१३६-९-६ पोष्टखर्च
६०१-१२-३ नवीन दिवाणखान्याकरितां
३१४-७-० छापणावळ

२७–२–० घरपट्टी
८८–१–४ बुकें व म्याझिनें खरेदी
१७२–७–० न्यू बुकें
६०–०–० कांग्रेसला वाटखर्च
२७–४–९ वाडा रिपेअर
२३–१२–० तारा
३९–८–३ जाहिरसभा
२०–८–६ पानसुपाऱ्या
१२–२–० सिल्की सामान
५–२–० गाडीभाडें
९–०–७ इन्कम्ट्याक्स
४–८–० भंगीपट्टी
९३–११–९ स्टेशनरी
८–५–९ व्याख्यानें
३–३–० लाइट,मेणबत्त्या वगैरे
२–१२–० बुकें बांधणें
१–११–० झाडलोट
०–७–३ धुलाई
२०–४–० घरपट्टीबद्दल अपील करण्याकडे
०–११–० पावतीचीं तिकिटें
६–१५–६ वार्षिक सभा
१०–१२–६ जनरल सभा
१–४–० नाटपेड पत्रांचें हशील
१८–६–९ किरकोळ

---

९९९०-१३-२
४९२-१२ त्रैमासिक

---

१४८३-९-२

92

१६७४१८२८४ शिल्लक पुढील सालाकरितां

३०२२४८१११८६

शके १८१९ सालांत जमा आली ती.

जमा. रुपये.

१६७४१८२८४ शिल्लक सालगुदस्त
१२११८१०८३ जमा सालमजकूर
१०१ वर्गणी
३३९—०—३ घरभाडें
३६—९—० देणगी
६०६—८—९ व्याज
१२८—८—० त्रैमासिक
०—०—३ किरकोळ
१२११—१०—३
१७९९२—१२—७

शके १८१९ सालांत खर्च झाला तो.

खर्च रुपये.

८७६—०—० पगार, स्कालर्शीप व पेन्शन.
१४—१९—० पोष्टखर्च.
२२—२—० स्टेशनरीखर्च.
१४९—८—० छपाई.
१—९—० गाडीभाडें
१४—८—१ इन्‌कम्‌ट्याक्स
३९—१०—३ वाडारिपेअर
४१—७—० घरपट्टी.
४—८—० भंगीपट्टी.
२६३—१४—६ त्रैमासिक
१२६—१—० श्री. होळकर सरकार यांचें धान्य वांटण्याचाखर्च.

१६—१२—९ मानपत्र डायमंड ज्युबिलीप्रीत्यर्थ.
९१—३—३ दुष्काळ एजंटांची वाटखर्ची,
२२९—१०—० ब्ल्यूबुकें
६२—१२—० पुस्तकें
११—७—३ सिलकी सामान
२०—०—० नवीन दिवाणखान्याकरितां.
३९—८—० तारा.
४०—०—० कांग्रेसकारितां वाटखर्ची
२४—९—० किरकोळ.

२०९२—१—१

१५९००—११—६ शिल्लक पुढील सालाकारितां

१७९९२—१२—७

शके १८२० सालांत जमा आली ती.

जमा रुपये.

१५९००—११—६ शिल्लक सालगुदस्त
११७२—१०—९ जमा सालमजकूर.
१८ वर्गणी
७० घरभाडें
३९ देणगी.
१०२७—१३—३ व्याज.
८—८ त्रैमासिक
८—९—६ डे. स्ट. कां. कमिटीकडून
९ अमानत.

११७२—१०—९

१७०७३—६—३

१५५८७-६-१ शिल्लक पुढील सालाकरितां.

## शके १८२२ सालांत जमा आली ती.

जमा रुपये.

१५५८७- ६-१ शिल्लक सालगुदस्त.

७५९-१४-६ जमा सालमजकूर.

९- ०-० वर्गणी

३२२- २-६ घरभाडें

४२८-१२-० व्याज

७५९-१४-६

१६३४७—४-७

## शके १८२२ सालांत खर्च झाला तो.

खर्च रुपये.

४३२—०-० पगार, पेन्शन

१—०-९ पोष्ट खर्च

४७—९-० वर्तमानपत्रें व बुकें.

०-१३-९ स्टेशनरी.

११-१४-० वाडा रिपेअर.

११-१२-० खुर्चीरिपेअर

२७—०-० घरपट्टी

७—०-० भंगीपट्टी.

११०—७-० दुखवटे.

१०४-११-० महाराणी

५-१२-० न्या. रानडे

११०—७-०

९२-११-० कांग्रेसकरितां वाटखर्ची

१०—३-४ इन्कमट्याक्स.

८-१३-० जाहिरसभा.

१—७—९ किरकोळ.

७५४—११—३

१५५९२—९—४ शिल्लक पुढील सालाकरितां.

---

## शके १८२३ सालांत जमा आली ती.

जमा — रुपये

१५५९२—९—४ शिल्लक सालगुदस्त.

१२५४—९—० जमा सालमजकूर.

३८२—१—० घरभाडें

८६७—८—० व्याज

५—०—० सामानविक्री

१२५४—९—०

१६८४७—२—४

---

## शके १८२३ सालांत खर्च झाला तो.

खर्च — रुपये

८३७—१—९ पगार, स्कालर्शीप व पेन्शन.

६—०—० पोष्टखर्च.

८१—१४—० पुस्तकें व वर्तमानपत्रें

६—१—३ स्टेशनरी

१२३—१०—६ वाडारिपेअर

०—३—० झाडलोट

०—२—३ धुलाई

२७—०—० घरपट्टी

४—०—० भंगीपट्टी

५६—२—० छपाई

०—४—६ लाईट

२—१०—९ शिलकी सामान

२४—४—१० इन्कमट्याक्स

०–१२–० लेक्चरसंबंधी
१२–३–६ जाहीरसभा
९३–१–० माणिकप्रभुछापखान्याखातीं
१६–९–६ किरकोळ

१२९१–१२–१०

१५५९९–९–६ शिल्लक पुढील सालाकरितां.

१६८४७–२–४

## शके १८२४ सालांत जमा आली ती.

| जमा | | रुपये |
|---|---|---|
| १५५९९—९–६ | शिल्लक सालगुदस्त. | |
| ११११–१२–० | जमा सालमजकूर. | |
| | २३३—०–० | घरभाडें. |
| | ५९८–१२–० | व्याज. |
| | ८०—०–० | देणगी. |
| | २००—०–० | माणिकप्रभु छा॰ माल विक्री. |
| | ११११–१२–० | |
| १६७०७—१–६ | | |

## शके १८२४ सालांत खर्च झाला तो.

| खर्च | रुपये | |
|---|---|---|
| | ४३७—०–० | पगार, स्कालर्शीप व पेन्शन. |
| | १–१५–१ | पोष्ट. |
| | १७७-१०–० | पुस्तकें व वर्तमानपत्रें. |
| | ०–१०–९ | स्टेशनरी. |
| | ११—७–० | वाडा रिपेर. |
| | ०—३–० | पावतीचीं तिकिटें. |
| | ०—१–० | धुलाई. |
| | २७—०–० | घरपट्टी. |

४—०—० भंगीपट्टी.
०—२—३ लाईट मेणबत्या.
१—१—० शिलकी सामान.
१९—९—१० इन्कम्‌ट्याक्स.
१८—१०—२ व्याख्यानांसंबंधी.
१७—१४—६ मानपत्रें.
१—६—० कमिशन.
०—१—६ न लिहिलेला खर्च.
४—६ किरकोळ.

७१८—१४—१

१९९८८—३—९ शिल्लक पुढील सालाकरितां.

१६७०७—१—६

शके १८२५ सालांत जमा आली ती.

जमा रुपये.

१९९८८—३—९ शिल्लक सालगुदस्त.
७९९—१२—६ जमा सालमजकूर.
२९२—०—० घरभाडें.
३४१—४—६ व्याज.
१—८—० पुस्तकविक्री.
१२९—०—० माणिकप्रभुछाप० सामान विक्री

७९९—१२—६

१६७४७—१९—११

शके १८२५ सालांत खर्च झाला तो.

खर्च रुपये.

४२७—०—० पगार, स्कालर्शीप, पेन्‌शन.
२—७—७ पोष्टखर्च.

११६—४—० पुस्तकें व वर्तमानपत्रें.
१—३—९ स्टेशनरी.
७—१—९ वाडारिपेअर.
०—०—६ गाडीभाडें.
०—१—० पावतीचीं तिकिटें.
२७—०—० घरपट्टी.
४—०—० भंगीपट्टी.
०—९—० लाइट.
८—११—२ इन्कमट्याक्स.
८—१०—० व्याख्यानांसंबंधी.
०—१२—० पानसुपारी.
५—०—० मानपत्र.
०—१०—० कमिशन.
२—१४—० जाहीरसभा.
९—११—६ किरकोळ.

६२२—०—३

१६१२५—१५—८ शिल्लक पुढील सालाकरितां.

१६७४७—१५—११

## शके १८२६ सालांत जमा आली ती.

जमा रुपये.

१६१२५—१५—८ शिल्लक सालगुदस्त.
६७६—४—० जमा सालमजकूर.
३१५—०—० घरभाडें.
३४१—४—० व्याज
२०—०—० पुस्तकविक्री.

६७६—४—०

१६८०२—३—८

### शके १८२६ सालांत खर्च झाला तो.

खर्च रुपये.

३६२—२—० पगार, स्कालर्शीप.
०—१०—० स्टेशनरी
१८८-४-९ वाडा रिपेअर
०—[illegible]—० गाडीभाडें.
०—६—६ व्याख्यानांकडे
८—१४—१ इन्कम्ट्याक्स
२९—०—० कांग्रेसची वाटखर्ची.
२—०—० खुर्ची रिपेअर.

५९१—११—४

१६२१०-८—४ शिल्लक पुढील सालाकरितां.

१६८०२-३-८.

### शके १८२७ सालांत जमा आली ती.

जमा रुपये

१६२०८—८—४ शिल्लक सालगुदस्त.
७४१—४—३ जमा सालमजकूर.
२३०—०—० घरभाडें.
५११—४—३ व्याज.

७४१-४-३

१६९४९-१२—७

### शके १८२७ सालांत खर्च झाला तो.

खर्च रुपये.

३९२—०—० पगार, पेन्शन.
३—०—६ स्टेनशरी.
१३२—३—६ पुस्तकें.
१३६-१४—३ वाडारिपेअर.

| | |
|---|---|
| ३—०—० | रेलवेभाडें. |
| ०—१—० | पावतीतिकिटें |
| ०—४—० | धुलाई. |
| १—०—० | कमिशन. |
| ९६—०—० | घरपट्टी भंगीपट्टी |
| ४—८—० | जाहीरसभा. |
| ४—०—० | शिलकीसामान. |
| ९—१२—३ | इन्कमट्याक्स. |
| ८—०—० | किरकोळ. |
| १९—१२—० | खुर्चारिपेअर वगैरे |
| २०—०—० | व्याख्यानें |
| ७९—०—० | कांग्रेसवाटखर्ची |
| ८२१—७—६ | |

१६१२८—९—१ शिल्लक पुढील सालाकरितां.

१६९४९-१२—७

## शके १८२८ सालांत जमा आली ती.

| जमा. | | | रुपये. |
|---|---|---|---|
| १६१२८—९—१ | शिल्लक सालगुदस्त. | | |
| ४६६—१—९ | जमा साल मजकूर. | | |
| | २००—०—० | घरभाडें. | |
| | ५४—०—० | वर्गणी. | |
| | १६—१२—३ | व्याज. | |
| | १७९—०—० | देणगी. | |
| | २०—५—६ | उसनवार. | |
| | ४६६—१—९ | | |
| १६५९४—६—१० | | | |

शके १८२८ सालांत खर्च झाला तो.

| खर्च | रुपये. |
| --- | --- |
| ४१९—०—० | पगार. |
| ६—१०—० | पोष्टखर्च. |
| १०७—१२—० | पुस्तकें, वर्तमानपत्रें. |
| ४—९—३ | स्टेशनरी. |
| ३४—११—३ | वाडा रिपेअर. |
| ०—१२—६ | लाइट, मेणबत्या वगैरे. |
| १९—२—६ | शिलकी सामान. |
| ४—०—० | छपाई. |
| ५४—८—० | खुर्चा रिपेअर. |
| ४—३—६ | किरकोळ. |
| १२—३—० | मजुरी. |
| ३—१०—० | झाडलोट. |
| ९—६—३ | जाहीरसभा. |
| ८२—७—० | तारा. |
| ५—१२—३ | गाडीभाडें. |
| १—११—० | रेलवेभाडें. |
| ७७०—१३—३ | |

१५८२३—९—७ शिल्लक.

१६५९४—६—१०

| | |
|---|---|
| २७—०—० | घरपट्टी. |
| ४—०—० | भंगीपट्टी. |
| ११-१२-० | जाहीरसभा. |
| १—४—० | लाइट. |
| १६—०—० | गाडीभाडें. |
| ७३-१०—० | किरकोळ. |
| २८७-१३-० | माणिकप्रभु छापखान्याखातीं. |
| १४९९-२-९ | |

१५५७४-३-६ शिल्लक पुढील सालाकरितां.

१७०७३-६-३

---

## शके १८२१ सालांत जमा आली ती.

जमा — रुपये

१५५७४-३-६ शिल्लक साल गुदस्त.

पोष्टखर्च.

| | |
|---|---|
| ३३–३–० | ग्याझिटें व पुस्तकें. |
| ८–२–९ | स्टेशनरी. |
| १०८–१०–० | वाडारिपेअर. |
| ०–१०–० | पावतीचीं तिकिटें |
| १–४–० | कमिशनखर्च |
| १६–०–८ | इन्कम्ट्याक्स. |
| २७–०–० | घरपट्टी. |
| ७–०–० | भंगीपट्टी. |
| १९–१२–० | श्री. महाराज होळकर यांचें धान्य वांटण्यास खर्च. |
| १५–०–० | कांग्रेस डेलिगेट खर्च |
| १२–८–० | श्री माणिकप्रभु छापखान्याकडे. |
| ७–१०–० | जाहिरसभा |
| २–०–० | छपाई |
| ०–८–६ | किरकोळ |
| ९७९–०–११ | |

काल रोजीं नगरकरांचे वाड्यांत कैलासवासी गणेश वासुदेव जोशी यांचे स्मारकाचे संबंधानें म्यानेजिंग कमिटीची सभा भरली होती. त्या वेळीं खालीं लिहिलेला ठराव पास झाला.

रा० रा० वामन शिवराम आपटे यांणीं सुचविल्यावरून त्यास रा० रा० केशवराव पांडुरंग गोडबोले यांचें अनुमोदन पडल्यावरून कैलासवासी गणपतरावजी जोशी यांचें स्मारक करण्याची व्यवस्था करण्याकरितां नेमलेल्या कमिटींत निरनिराळ्या ठिकाणीं स्थापन झालेल्या मंडळींच्या चिटणिसांस खालीं लिहिल्याप्रमाणें पत्र पाठवावें:—

ठिकठिकाणीं परलोकवासी गणपतराव जोशी यांचें स्मारककृत्य करण्यांकरितां मंडळ्या स्थापन होऊन फंडही जमा होत आहे, त्या मंडळीस पत्रें पाठवून विनंती करावी कीं, पुणें मुक्कामीं सर्व देशाच्या उपयोगी पडण्याजोगें चांगलें कोणतें स्मारककृत्य करावयाचें तें ठरत आहे; तें ठरेपर्यंत आपले येथें जमलेल्या फंडाची व्यवस्था मेहेरबानी करून आपण लावूं नये, व त्याचप्रमाणें सर्व देशाच्या उपयोगी पडण्याजोगें कोणतें कृत्य करावें ह्याजविषयीं आपणास कांहीं सूचना करावयाच्या असतील तर त्या येते रविवारीं म्हणजे ता० ९ सप्तंबरचे आंत पत्रद्वारा या कमेटीस कळविण्याची मेहेरबानी करावी म्हणजे सर्वांचा विचार करण्यास ठीक पडेल.

**माधवराव यशवंत रास्ते,**
**शिवराम हरि साठे,**
सेक्रेटरी.

---

ज्ञानप्रकाश छापखाना पुणें.

## स्मारक करण्याचे संबंधानें झालेला ठराव.

कैलासवासी गणपतराव जोशी यांचें स्मारक कृत्य करणें तें पुणें शहरांत एक मोठी इमारत बांधून तींत सार्वजनिक सभेचें आफिस राहून कलाकौशल्यास उत्तेजन देण्याकरितां एक शाळा (Industrial Institution) स्थापण्याची सोय होईल असें करावें. कलाकौशल्याची शाळा स्थापणें ती आनरेबल सर मंगळदास नथुभाई व आनरेबल मुरारजी गोकुळदास व राव बहादूर गोपाळराव हरी देशमुख वगैरे अनुभवशीर गृहस्थांचे विचारें स्थापन करण्यांत येईल.

---

ज्ञानप्रकाश छापखाना पुणें.

## कैलासवासी रा० रा० गणेश वासुदेव जोशी यांचें स्मारककृत्य.

A MEMORIAL TO THE LATE Mr. GANESH WASUDEO JOSHI.

कैलासवासी रा० रा० गणेश वासुदेव जोशी यांचे संबंधानें कांहीं स्मारककृत्य करण्याचा विचार होण्यास्तव काल रोजीं येथील आनंदोद्भव नाटकगृहांत सर्व लोकांची जाहीरसभा भरली होती. सभास्थानीं सायंकाळचे पांच वाजण्याच्या सुमारास मंडळी जमण्यास सुरुवात झाली, व हळू हळू थोडक्याच काळांत सर्व नाटकगृह भरून जाऊन चोहोंकडे फार गर्दी झाली. ह्या प्रसंगीं शहरांतील सर्व मोठमोठाले शेट, सावकार व सरकारी कामगार व इतर सभ्य गृहस्थ आले होते. सभेस आरंभ होण्याच्या पूर्वी रा० रा० नारायण चिंतामण फडतरे यांणीं अशी सूचना केली कीं, राव बहादूर गोपाळराव हरी देशमुख यांस सभेचे अध्यक्ष नेमावें. ह्या सुचनेस रा० रा० माधवराव यशवंत रास्ते यांणीं अनुमोदन दिलें, व ती एकानुमतें पसंत झाली. तदनंतर रा० ब० देशमुख यांणीं सभा भरविण्याचा उद्देश थोडक्यांत सांगून कैलासवासी जोशीबोवा यांच्या संबंधानें दुःख प्रदर्शित करणाऱ्या मद्रास व कलकत्ता येथील तारा व वेंगुर्लें येथील एक पत्र वाचून दाखविलें, व अशा रीतीनें सभेच्या कामास सुरुवात केली. पुढें रा० ब० चिंतामण सखाराम चिटणीस यांणीं अशी सूचना केली कीं, रा० रा० गणेश वासुदेव जोशी यांच्या अकालिक व आकस्मिक मृत्यूच्या संबंधानें आपल्यास फार दुःख झालें आहे असा ठराव व्हावा. सूचनेच्या संबंधानें रा० ब० चिटणीस यांणीं समयास उचित व मनवेधक असें संभाषण केलें. तदनंतर वे० शा० रामदीक्षित आपटे यांणीं मोठ्या प्रौढ विचाराचें असें सुरेख संभाषण करून रा० ब० चिटणीस यांच्या सुचनेस आपलें अनुमोदन दिलें. पुढें प्रोफेसर महादेव मोरेश्वर कुंटे यांणीं अशी सूचना केली कीं, रा० रा० गणेश वासुदेव जोशी यांचें स्मरण आपल्यास चिरकाल राहील असें कांहीं स्मारककृत्य आपण करून ठेवावें, व जसे कैलासवासी काका सर्वत्रांचे उपयोगी पडत असत तसा ह्या स्मारक कृत्यापासून सार्वजनिक मोठा फायदा होईल अशी व्यवस्था करावी. प्रोफेसर कुंटे यांणीं ह्या सुचनेच्या संबंधानें फारच उत्तम असें संभाषण केलें. तदनंतर मि० हरी रावजी चिपळोणकर यांणीं ह्या सुचनेस आपलें अनुमोदन दिलें. सभेचें काम वर लिहिल्याप्रमाणें झाल्यानंतर मि० व्ही. राजे रतन, मद्रास येथील एक प्रसिद्ध व्यापारी यांणीं कैलासवासी जोशीबोवा यांच्या संबंधानें संभाषण केलें. हे व्यापारी जोशीबोवा यांस भेटण्याकरितां मुद्दाम येथें आले होते, परंतु त्यांस येथें आल्यानंतर जोशीबोवा मरण पावले अशी खबर लागली. मि० व्ही. राजे रतन यांस ही बातमी लागल्या बरोबर त्यांस मोठें दुःख झालें, व काकांचें स्मारककृत्य करण्याबद्दलच्या जाहीरसभेत आपण समक्ष हजर राहावें ह्मणून त्यांनीं येथें आपला मुक्काम केला. तसेंच मि० दिनकर बल्लाळ चक्रदेव सोलापूर येथील प्रसिद्ध वकील यांणीं आपल्या गांवचे लोकांच्या वतीनें मी ह्या प्रसंगीं आलों आहे, व त्यांस हें सभेचें काम फारच अनुमत आहे असें सांगून जोशीबोवा यांचा पुष्कळ गुणानुवाद गाईला, व त्यांचे अकालिक मृत्यूपासून आपले सर्व देशबांधवांस झालेलें अतोनात दुःख प्रदर्शित केलें. तसेंच मि० वासुदेव लक्ष्मण आठवले यांणींही जोशिबोवा यांजपासून घडलेला सार्वजनिक फायदा मोठ्या दुःखकारक शब्दांनीं वर्णून त्यांच्या संबंधानें आपलें कर्तव्यकर्म कोणतें आहे व काकांचे आपण कसे ऋणी आहोंत व हें ऋण आपल्यास कसें फेडलें पाहिजे वगैरे गोष्टी सांगितल्या. तदनंतर मि० व्यंकटेश

सूचना केली कीं, बोवा यांचें स्मारककृत्य करण्याचे संबं-नि वर्गणी जमविण्याचें काम सुरू करावें, व ह्या संबंधाची सर्व व्यवस्था ठेवण्यास एक कमेटी नेमावी. ह्या सुचनेस श्री० चिंतामणराव विश्वनाथ नातु यांणीं आपलें अनुमोदन दिलें व ती सर्वानुमतें पसंत ठरली. सभास्थानी वर्गणीची यादी फिरत असतां सुमारें २००० रुपयांचे आंकडे पडले आहेत व यांपैकीं १०२ रुपये जागच्या जागींच वसूल झाले असें म्हणतात. या सभेच्या संबंधानें दुसरी एक गोष्ट लिहिली पाहिजे ती अशी कीं, कैलासवासी जोशीबोवा यांचे संबंधानें शोकार्तगीत असें एक लहानसें पुस्तक सभास्थानीं विकावयास बसलें होतें व ह्या पुस्तकाबरोबर काकांची एक हुबेहुब तसबीरही देण्यांत येत होती. हें पुस्तक समयास मोठें उचित असून त्याचा सर्व पैसा स्मारकाकडे लावावयाचा असाही मंथ करर्त्याचा इरादा आहे.

## PROCEEDINGS OF YESTERDAY'S PUPLIC MEETING.

As announced in our last a public meeting of the inhabitants of Poona was held in the Anandodhabhava Theatre yesterday evening. The house was crowded to suffocation, and almost all the leading members of the native community were present on the occasion, thereby evincing in an unmistakable manner their profound admiration of the many amiable qualities and eminent services of the deceased gentleman. The chair was occupied by Rao Bahadur Gopal Rao Hari Deshmookh who in an appropriate speech quite worthy of the occasion dwelt upon the manifold claims of the deceased gentleman upon the gratitude of his countrymen. First of all he read a telegram from Calcutta and a letter from the Konkan expressing sympathy with the object of the meeting. He also alluded to the presence of a representative from Madras. The Chairman said that his acquaintance with the deceased gentleman was of a long duration ranging over a period of n[illegible] twenty years and that according [illegible] his former impressions he was mere ordinary man of a[illegible] clerkly abilities, who like his [illegible]temporaries was given to seek [illegible] own interests. No body drea[illegible] that Mr. Ganesh Wasudeo [illegible] would prove to be that unselfi[illegible] self-sacrificing and patriotic pers[illegible] that he proved himself. He sa[illegible] he fully concurred with those wh[illegible] regarded and do still regard Mr. Joshi as having been inspired. He concluded by calling upon the gentlemen having propositions in their charge to move them for the acceptance of the meeting.

The first proposition before the meeting was as follows :—

That this meeting records with regret the fact of the untimely and sudden death of Mr. Ganesh Wasudeo Joshi.

It was moved by Rao Bahadur Chintaman Sakharam Chitnis and seconded by Mr. Rama Shastri Apte. The next proposition was as follows :—

That this meeting is of opinion that there should be some fitting memorial by which the memory of Mr. Ganesh Wasudeo Joshi would be perpetuated and some lasting public good effected.

It was moved by Mr. Mahadeo Moreshwar Kunte B. A. and seconded by Mr. Hari Rowjee Chiplonkar. Mr. V. Rajaratam, a rich Madras Merchant, Mr. Dinkar Ballal Chakradeo, Pleader District Court Sholapoor, and Mr. Wasudeo Lakshman Athavale made appropriate and excellect speeches in support of the proposition. Then an influential committee consisting of about twenty gentlemen with power to add to their number was appointed to collect subscriptions in aid of the fund and to determine the shape of the memorial. This brought the first business befo[re] the meeting to a close, not before about Rupees two thousand had been subscribed on the spot.

ज्ञानप्रकाश छापखाना पुणें.

ग्रं/१ प्र. १८५५



त्यांच्या धंद्यांचीं कामें काढण्याचें कलमच सरकारानें फ्यामिन कोडांतून काढून टाकल्यामुळें साळी कोष्टी या कारागिरांना व त्यांच्या बायकापोरांना खडी फोडण्याचाच धंदा काय तो मोकळा राहिला. ठिकठिकाणीं रिलीफ कामें सुरू झालीं होतीं त्यांवरील लोकांची स्थिति समजून घेऊन ती सरकारास कळविण्याकरितां माहिती मिळविण्यासाठीं सभेनें, दिजंबर १८९६ अखेर ४०० रुपये खर्च केला; व या कृत्यांत सभेचा एकंदर खर्च साडेपांचशें रुपयांवर झाला; हें सभेच्या हिशेबपत्रकांवरून दिसून येणार आहे. निरनिराळ्या जिल्ह्यांत जाऊन रिलीफ कामांवरून व दुष्काळग्रस्त प्रदेशावरून फिरून सभेस अशा तऱ्हेची माहिती मिळवून देण्याचें काम खालील सद्गृहस्थांनीं केलें;-रा.रा. नरसिंह चिंतामण केळकर बी. ए. एल्. एल्. बी; रा. रा. शंकर श्रीकृष्ण देव बी. ए. एल्. एल्. बी; रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे बी. ए.; रा. बाबाजी काशिनाथ पटवर्धन ऊर्फ महाडकर जोशी; अच्युत सिताराम साठे एम्. ए; शिवराम महादेव परांजपे एम्. ए; केशव रघुनाथ अवस्थी; शंकर गणेश लवाटे; गोविंद कृष्ण टिळक; आनंद रावजी एकसंबेकर; नारायण सखाराम बर्वे; कृष्णाजी रामचंद्र वेलणकर; गोविंद काशिनाथ चांदोरकर बी. ए. एल्. एल् बी; हरि गणेश आपटे; विठ्ठल व्यंकटेश जोशी; कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर बी.ए. व ह. प. नारायण रामचंद्र घमेंडे.

वरील गृहस्थांना सभेकडून फक्त वाटखर्चींच देण्यांत आलेली होती. वरील सार्वजनिक कृत्य निरपेक्ष बुद्धीनें करून सभेस मदत केल्याबद्दल सभा वरील सद्गृहस्थांची आभारी आहे; आजच्या प्रसंगीं वरील गृहस्थांपैकीं कांहीं गृहस्थ हयातही नाहींत, याबद्दल सभेस दिलगिरी वाटते. वरील गृहस्थांपैकीं राजश्री शंकरराव देव यांनीं तर सभेचे खर्चाचेही पैसे घेतले नाहींत याबद्दल सभा त्यांची विशेष आभारी आहे.

सभेकडून, दुष्काळाची माहिती मिळविण्याकरितां बाहेर गेलेल्या गृहस्थांच्या सोयीसाठीं व दुष्काळपीडित लोकांच्या समजुतीकरितां सभेनें फ्यामिन कोडाचें मराठींत थोडक्यांत भाषांतर पुस्तकरूपानें करवून त्याच्या व दुष्काळसंबंधी लोकोपयोगी फुटकळ माहितीच्या पत्रकांच्या

हजारों प्रती सभेच्या एजंटांमार्फत व अन्यद्वारां लोकांत वांटल्या; त्यामुळें सरकारचे दुष्काळनिवारणासंबंधी हेतु अज्ञ लोकांना कळून बराच उपयोग झाला.

श्रीमंत महाराज शिवाजीराव बाळासाहेब माजी होळकर सरकार यांनीं पुणें जिल्ह्यांतील दुष्काळानें गांजलेल्या गरीब अनाथ लोकांना वांटण्याकरितां सभेकडे धान्याचीं २३६ पोतीं पाठविलीं. तीं ह्या जिल्ह्यांत ठिकठिकाणीं वांटण्यांत आलीं; त्या वांटण्यास सभेस एकंदर खर्च जवळ जवळ दीडशें रुपये आला आहे. महाराजांनीं सभेसच ही कामगिरी सांगून तिचा जो सन्मान केला त्याबद्दल सभा त्यांची आभारी आहे.

परंतु दुष्काळांत सांपडलेल्या लोकांच्या उपयोगाकरितां सभेनें ही केलेली जीवापाड मेहनत सरकारास नितकी रुचलीशी दिसत नाहीं. कुलाबा जिल्ह्यांत सभेनें नेलेले एजंट-रा. रा. अच्युत सिताराम साठे यांजवर फौजदारी खटला करण्यांत आला होता, परंतु आरोप ठेवण्याइतका देखील सरकारी पुरावा नसल्यामुळें त्यांतून ते सुटले. सभेच्या एजंटांपैकीं रा. रा. आनंद रावजी एकबोटेकर यांनीं आपल्या स्वतःच्या मुखत्यारीनें दुष्काळ माहितीसंबंधाचीं कांहीं हस्तपत्रकें प्रसिद्ध केलीं होतीं. तीं कोणच्याही तऱ्हेनें सभेच्या अखत्यारीनें प्रसिद्ध करण्यांत आलीं नाहींत, असें सभेकडून सरकारांत कळविण्यांत आलें असतांना मुंबई सरकारची मर्जी जाऊन त्यांनीं सभेच्या अर्जाचा विचार मुंबई सरकार करणार नाहीं असा रागानें ठराव केला ( सरकारचा ठराव नंबर ८७९ ता. १७ मार्च १८९७ ). सरकारानें सभेविरुद्ध केलेला ठराव रद्द करावा म्हणून सरकारास ( एप्रील १८९७ त ) विनंति करण्यांत आली होती; पण तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. असो; ह्या नाहीं तर इतर मार्गानें राजकीय प्रश्नासंबंधानें लोकमत जागृत करण्याचा सभेचा मुख्य व प्रशस्त उद्देश सिद्धीस नेण्यास कोणाची आडकाठी नव्हती व तसें करण्याचें सभेच्या मनांतही होतें; परंतु सरकारच्या रोषाबरोबर परमेश्वराचाही रोष लोकांवर प्लेग रूपानें व्हावयास लागला व तोही निरनिराळ्या रूपानें सभेच्या कर्तृत्वशक्तीस भोंवला.

सन १८९७ सालचा पुण्यांतील प्लेग शमविण्यास इंग्रजसरकारचे ऑफीसर रँडसाहेब यांनीं ज्या तऱ्हा अमलांत आणल्या त्या लोकांना अतिशय त्रासदायक झाल्या. शेवटीं ता. २२ रोजीं म्हणजे महाराणीसाहेबांच्या डायमंड ज्युबिलीच्या प्रसंगीं रात्रीं गणेशखिंडीत रँड साहेबांचा खून झाला. पुण्याच्या एकंदर लोकसमूहाचा या कृत्याशीं संबंध नव्हता ही गोष्ट आतां सिद्ध झाली आहे तथापि ह्या एका गोष्टीनें त्या वेळीं सरकार संतापून जाऊन संतापाच्या तडाक्यांत प्युनिटिव्ह पोलिस, राजद्रोहाचे व इतर खटले, हद्दपारी व कसलीही चौकशी न करितां मिळणारे तुरुंगवास सुरू झाले. या बावटळींत सभेचे प्रमुख सभासद रा. रा. बाळ गंगाधर टिळक व श्री. रा. रा. बाळासाहेब नातू हे सांपडून त्यांना तिच्यामुळे अनेक हाल भोगावे लागले. अशा वेळीं, ही बावटळ अगदीं शांत होऊन प्रजानें डोकें वर काढूं दिल्याबरोबर पुनः स्वकर्तव्यास सुरवात करावी असा सभेनें विचार केला. १८९७ सालीं उमळलेल्या बावटळीचे दूरदूरचे फेरे आतां दबल्यासारखे झाले आहेत; परंतु प्लेग अद्यापी संपलेला नाहीं. तथापि आतां सांपडेल तेवढ्या स्वस्थ वेळांत आपल्या कर्तव्यास पुनः उमेदीनें सुरवात करावी असें सभेनें मनांत आणलें आहे. लेपरबिल; — महारोग्यांसंबधाच्या निर्बंधाचें बिल १८९६ सालीं हिंदुस्थानसरकारच्या कायदेकौंसिलपुढें आलें होतें. त्यासंबंधानें एक दोन सूचना सुचवून हिंदुस्थानसरकाराकडे एक अर्ज सप्टेंबर १८९६ त सभेकडून पाठविण्यांत आला. तसेंच सन १८९८ सालीं सिविल कोड व क्रिमिनल प्रोसीजर दुरस्त करण्याकरितां हिंदुस्थान सरकारापुढें जें बिल आलें त्याबद्दलही हिंदुस्थानसरकाराकडे अर्ज पाठविण्यांत आला होता.

## सभेनें भरविलेल्या जाहीरसभा.

स्वाकीममध्यें झालेल्या लढाईशीं हिंदुस्तानचा कांहीं संबंध नसतां तिच्या खर्चाचा वाटा हिंदुस्तानावर खुद्द पार्लमेंटसभेनें ' केवळ अन्यायानें व जुलमानें ' लादला त्याबद्दल निषेध प्रदर्शित करण्याकरितां व अज्ञानें लोकांत असंतोष उत्पन्न होणार आहे असें प्रसिद्ध करण्या

करितां शहर व लष्कर येथील रहिवाशांची जाहीरसभा ता. १८ माहे जुलई रोजीं भरविण्यांत आली होती.

पुणें म्युनिसिपालिटींत सरकारानें दहा कमिशनर नेमावयाचे व लोकांनीं वीस निवडून द्यावयाचे असा क्रम असतां व हें प्रमाण म्युनिसिपालिटीकडून तसाच कांहीं नालायकपणा दाखविण्यांत आल्याशिवाय, लोकांच्या बाजूनें कमी करण्यांत येणार नाहीं असें माजी गव्हरनर लार्ड री साहेब यांनीं आश्वासन दिलें असतां, सरकारानें ता. २३ आगष्ट १८९८ रोजीं एकदम ठराव प्रसिद्ध करून, काहीं कारण न दाखवितां, सरकारांतून नेमल्या जाणाऱ्या कमिशनरांची संख्या दहाची अठरा केली. हा ठराव रद्द करण्याविषयीं सरकारास विनंति करण्याकरितां शहरांतल्या म्युनिसिपल मतदारांची जाहीरसभा ता. १६ आक्टोबर १८९८ रोजीं भरविण्यांत आली होती.

तारीख ३१ माहे डिसेंबर सन १८९९ रोजीं, श्री. बळवंत रामचंद्र नातू व त्यांचे बंधु तात्यासाहेब हे इंग्रजसरकारच्या अटकेंतून सुटल्याबद्दल लोकांस झालेला आनंद प्रदर्शित करण्याकरितां नवीन दिवाणखान्यांत जाहीरसभा भरविण्यांत आली होती.

जमीन महसुलाच्या कायद्याच्या दुरुस्तीचें बील मुंबई सरकारच्या कायदेकौंसिलापुढें आलें आहे तें रयतेच्या हितास अत्यंत विघातक आहे हें सरकारास जाहीर करण्याकरितां, ता. ७ जुलई सन १९०१ रोजीं, पुण्यांतील लोकांची जाहीरसभा, श्री. रा. रा. सदाशिव रघुनाथ मेढतकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली होती.

वरील कार्याकरितां ता. १ माहे सपटंबर १९०१ रोजीं दुसरी जाहीरसभा भरविण्यांत आली होती.

महाराणी व्हिक्टोरिआ साहेब ता. २२ जानेवारी १९०१ रोजीं वारल्या; त्याबद्दल दुःखप्रदर्शन करण्याकरितां सभेच्या नव्या दिवाणखान्यांत जाहीरसभा भरविली होती.

काबूलचे अमीर हबीबउल्लाखान यांची स्वारी हिंदुस्थानांतून फिरत फिरत ता. १२ फेब्रुवारी १९०७ रोजीं मुंबईस आली. त्यांच्या स्वा

गतार्थ, सार्वजानिक सभेनें ता. ९।२।०७ रोजीं आपल्या नवीन दिवाणखान्यांत जाहीरसभा भरवून आनंदप्रदर्शक तार पाठविली. हिंदु व मुसलमान या दोन जातींमध्यें बंधुप्रेम सदैव नांदत असावें व हिंदुलोकांचीं मनें दुखविणारा गोवध मुसलमानांनीं बंद करावा असे कळकळीचे उद्गार अमीर साहेबांनीं काढून जो उपदेश केला त्याबद्दल विशेषतः या तारेमध्यें कृतज्ञता प्रगट केली आहे.

## इतर जाहीरसभा.

प्रसिद्ध मराठी मुत्सद्दी कै. नाना फडणीस यांच्या शतसांवत्सरिक श्राद्धतिथीनिमित्त ता. १७ मार्च १९०० रोजीं नवीन दिवाणखान्यांत जाहीरसभा भरविण्यांत आली होती.

शिवराई खुर्दा चालविण्याबद्दल ता. ९ आगष्ट १९०० रोजीं जाहीरसभा भरविण्यांत आली होती.

प्लेगसंबंधानें जाहीरसभा; ता. १९ आगष्ट १९००.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या श्राद्धतिथीसंबंधानें जाहीरसभा ता. ६ एप्रील १९०२.

मार्च १९०६ त स्वदेशी चळवळीसंबंधानें सभेच्या नवीन दिवाणखान्यांत सभा झाली.

ता. १० मार्च १९०७ रोजीं बुधवार पेठेच्या रहिवाशांची जाहीरसभा भरली होती.

ता. १२ मार्च १९०७ रोजीं कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची स्मारकसभा भरली होती.

## व्याख्यानें.

ता. १७ जुलई १८९६;—मि. वीरचंद गांधी बी. ए. 'My impression of America.'

ता. ३० आगष्ट १८९६;—प्रो. चिंतामण गंगाधर भानु, क्रुसेड्स.

ता. १३ आक्टोबर १८९६;—वे. शा. गणेशशास्त्री बेटगीरकर.

ता. २९ जुलई १८९७;—प्रो. फ्रेजर, 'Liberalism.'

ता. २१ जानेवारी १९००;—डॉ. वामन बाजी रुईकर, 'प्लेग व इतर रोग यांस प्रतिबंधक मिठाचे अंगीं गुण.'

मे १९०२;—श्रीहंसस्वरूप स्वामी यांचीं धार्मिक व्याख्यानें.

फेब्रुवारी १९०२;—डाक्तर शरच्चंद्र मलीक यांचें व्याख्यान.

ता. २९।३।०२ रोजीं एका स्वामींचें व्याख्यान.

ता १६।१०।०२ रोजीं रा. रा. नारायण शिवराम बर्वे यांचें व्याख्यान.

ता. १४ माहे सप्टेंबर १९०४ रोजीं रा. ब. रघुनाथ महादेव केळकर यांचें व्याख्यान.

मार्च १९०६ त मिसेस स्टानर्ड बाईचीं दोन व्याख्यानें करविण्यांत आलीं.

## मानपत्रें.

माजी महाराणी विक्टोरिया साहेब यांनीं राज्य करावयास लागून १८९७ सालीं साठ वर्षे झालीं त्याचा महोत्सव ' डायमंड ज्युबिली ' नांवानें हिंदुस्तानांत करण्यांत आला. त्या प्रसंगाप्रीत्यर्थ सभेकडून महाराणी साहेबास मानपत्र ता. ४ जून १८९७ रोजीं मुंबई [illegible] पाठविण्यांत आलें.

दिल्ली दरबाराला जाण्याकरितां म्हैसूरचे महाराज कृष्णराज यांची स्वारी पुण्यास ता. २ दिसेंबर १९०२ रोजीं आली, त्या प्रसंगीं पुणें शहरांतील सर्व संस्थांचें एकवट मानपत्र महाराजांस स्टेशनचे प्ल्याटफार्मवरच समर्पण करण्यांत आलें.

## पानसुपाऱ्या.

ग्वाल्हेरचे श्री. रा. उमदेतुल मुलुख राजराजेंद्र रामचंद्रराव नरसिंगराव शितोळे यांची स्वारी पुण्यास आल्यावरून त्यांना सभेनें ता. ३ जून १८९६ रोजीं पानसुपारीस बोलाविलें होतें. शितोळे साहेबांनीं सभेस शंभर रुपयांची देणगी दिली आहे, तीबद्दल सभा त्यांची आभारी आहे.

मेहरबान केन व गुडरिज साहेब पुण्यास आल्यावेळीं सभेनें त्यांना ता. २९ जानेवारी १८९७ रोजीं पानसुपारी केली.

विलायतेंतील टेंपरंस सभेचे सेक्रेटरी मि. फ्रेडरिक ग्रबसन १८९८ सालीं हिंदुस्थानांत आले. ते पुण्यास आल्यावर त्यांना सभेनें ता. १९ दिसेंबर १८९८ रोजीं जोशीहाॅलांत पानसुपारी केली.

## दुखवट्याचीं पत्रें, तारा व ठराव.

रा. ब. हरि रावजी चिपळूणकर हे वारल्यावर त्यांचे चिरंजीवाकडे ता. १७ मार्च १८९६ रोजीं मंडळी दुखवट्याचें पत्र घेऊन गेली होती. ना. महादेव गोविंद रानडे ता. १६।१।०१ रोजीं वारले; त्यांचे बंधु व इतर कुटुंबाची मंडळी यांचें सांत्वन करण्याकरितां सभेतर्फे मंडळी गेली होती.

मनमोहन घोस, वे. शा. राजारामशास्त्री बोडस, सभेचे उपाध्यक्ष श्री. रा. रा. रामचंद्रराव गोपाळ ऊर्फ आप्पासाहेब पटवर्धन संस्थान जमखिंडी, रा. जव्हेरिलाल उमियाशंकर याज्ञिक, लेफ्टेनंट आर्मी व मि. ग्यांड, रा. काशीनाथ त्र्यंबक [illegible], रा. रणछोडलाल छोटालाल, सभेचे उपाध्यक्ष श्री. बापूसाहेब कुरुंदवाडकर, सभेचे अध्यक्ष [illegible] पंत प्रतिनिधि संस्थान औंध, श्री. गणपतराव विनायक ऊर्फ बाबासाहेब सांगलीकर, सभेचे उपाध्यक्ष श्री. [illegible] चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब सांगलीकर, यांच्या मृत्यूबद्दल दुःखप्रदर्शक पत्रें पाठविण्यांत आलीं. नेकनामदार ग्लाडस्टनसाहेब व व्हिक्टोरिआ महाराणीसाहेब, यांच्या मृत्यूच्या बातम्या आल्यावर दुःखप्रदर्शक तारा पाठविण्यांत आल्या.

सभेचे सभासद रा. सा. बळवंत बापू फडके, दामोदर यशवंत जोग, नारायण बापूजी कानिटकर, काशीनाथ गोविंद नातु, संस्थेचे उपाध्यक्ष श्री. बाबा महाराज, रा. सा. गणेश रामचंद्र फडके, भास्कर कृष्ण कोल्हटकर, रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे, हे वारल्याबद्दल दुःखप्रदर्शक ठराव करण्यांत आले.

गेल्या ८।१० वर्षांत सभेचे सभासद व हितचिंतक असे आणखी अनेक गृहस्थ मृत्यु पावल्याबद्दल सभेस फार दिलगिरी होत आहे.

## सभेचा नवीन दिवाणखाना.

शके १८१७ सालच्या रिपोर्टांत दाखल केलेल्या कारणांकरितां सभेच्या वाड्यांतील पश्चिमभागांत कमीजास्ती घडमोड करून जाहीरसभा व व्याख्यानांकरितां विस्तृत दिवाणखाना तयार करण्याचें

काम शके १८१८ सालीं पुरें झालें. या कामास एकंदर खर्च जवळजवळ साडे सहाशें रुपये लागल्याचें खर्चाच्या टिपणावरून कळून येईल.

### किरकोळ.

( १ ) मुंबईचे कै० दामोदर माधवराव डुकले यांनीं आपले मृत्यूपूर्वी आपली सर्व जिनगी, आपल्या बायकोच्या अन्नवस्त्राचा खर्च खेरीज करून, धर्मार्थ कृत्याकडे लावण्याकरितां, पुणें सार्वजनिक सभेला मृत्युपत्रद्वारें ट्रस्टी नेमिलें आहे. यासंबंधाचें पत्र त्यांचे सालीसिटरकडून ता. २४ आगष्ट १८९७ रोजींचें आलेलें आहे.

( २ ) गेल्या काळांत प्रत्येक वर्षी ज्या राष्ट्रीय व प्रांतिकसभा झाल्या आहेत त्यांस सभेकडून प्रतिनिधी निवडून पाठविण्यांत आले आहेत.

( ३ ) त्रैमासिक;—हें पुढें बंद झालें.

( ४ ) देणग्या;—ग्वाल्हेरचे श्री. शितोळे यांच्याकडून आली दे[illegible] रुपये; कै० न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांनीं एक हजार रुपये रकमेचें व्याज देणगी म्हणून दरसाल देण्याचें कबूल केलें होतें, त्याप्रमाणें शके १८२२ साल खेरीज करून प्रत्येक सालाबद्दल ३९ रुपये शके १८१८ सालापासून सभेकडे आले आहेत; त्याबद्दल सभा त्यांच्या कुटुंबाची आभारी आहे. रावसाहेब काळुराम भाऊ नाईक यानीं १९०२ च्या आगष्ट महिन्यांत सभेकरितां एनसायक्लोपिडीया ब्रिटानिका घेण्याकरितां ८० रुपये देणगी दिली तीबद्दल सभा त्यांची फार आभारी आहे. इतर लहान लहान देणग्या ज्यांच्याकडून आल्या आहेत त्यांचेही सभा आभार मानते.

शके १८१८ साल आरंभापासून नवीन सभासद झाले ते;—

रा. रा. महादेव राजाराम बोडस, एम्. ए. एल्. एल्. बी.

रा. रा. शिवशंकर दुर्गाप्रसाद दीक्षित.

रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर बी. ए. एल् एल्. बी.

रा. रा. शिवराम महादेव परांजपे एम्. ए.

रा. रा. नारायण वासुदेव फडके.

रा. रा. सखाराम वामन रानडे.

रा. रा. अच्युत सिताराम साठे एम्. ए.

श्री.

पुणें, सार्वजनिक सभेची कचेरी,
ता. २२ मार्च सन १९०७.

वि. वि. हल्लीं श्रीमंत नानासाहेब पंत प्रतिनिधी, औंध संस्थानाचे अधिपति यांच्यावर कांहीं तोहमत आलेली असून तिचा इनसाफ करण्याकरितां सरकारानें कमिशन नेमिलें आहे. या कमिशनच्या रचनेसंबंधानें वगैरे सरकारास लोकमत कळविण्याकरितां उद्ईक म्हणजे ता. २३ मार्च सन १९०७ शनिवार रोजीं सायंकाळीं सहा वाजतां सार्वजनिक सभेमार्फत सभेच्या नवीन दिवाणखान्यांत पुणें शहरवासी लोकांची जाहीरसभा भरविण्यांत येणार आहे; तरी त्या वेळीं आपण अगत्य येण्याची कृपा करावी. कळावें हे विनंति.

**विनायक रामचंद्र पटवर्धन,**
चेअरमन-सार्वजनिक सभा, पुणें.

चित्रशाळा प्रेस, पुणें.

८०

श्री.

चि० त्रि०. श्रीछत्रपति शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव साल्याबादप्रमाणें वैशाख शुद्ध द्वितिया शके १८२० तारीख २२ एप्रील सन १८९८ शुक्रवार रोजीं सुरू होऊन तीन दिवस चालेल. उत्सवाची कार्यक्रमपत्रिका दुसरे बाजूस दिली आहे. आपण येऊन हा उत्सव साजरा कराल अशी मंडळीस आशा आहे.

उत्सवाची जागाः—सदाशिव पेठ लकडीपुलाजवळील श्री विठ्ठल मंदीर.

पुणें, तारीख २१ एप्रील सन १८९८.

बाळकृष्ण रामचंद्र वैद्य.
चिंतामण हरि सोहनी.
निळकंठ दामोदर जोग.
चिटणीस श्रीशिवाजी उ. कमेटी पुणें.

# कार्यक्रमपत्रिका.

## दिवस पहिला.

( शुक्रवार, तारीख २२ एप्रील. )

सकाळीं ९–११ उत्सवाची कथा.
सायंकाळीं ५–७ व्याख्यान.
रात्रौ ९–११ निबंधवाचन.

## दिवस दुसरा.

( शनिवार; तारीख २३ एप्रील. )

सकाळीं –१० गायन.
सायंकाळीं ५–७ प्रो. परांजपे यांचें पुराण.
रात्रौ ९–११ वे. शा. सं. रामाचार्यांची कथा.

## दिवस तिसरा.

( रविवार, तारीख २४ एप्रील. )

सकाळीं ७–१० शारिरीक खेळ.
सायंकाळीं ५–७ रा. रा. गोपाळ छोटीराम वकील यांचें व्याख्यान.

रात्रौ प्रो. जिनसिवाले यांचें व्याख्यान.

ह्याशिवाय जर कोणा या उत्सवांत व्याख्यान, पुराण, कथा वगैरे करण्याबद्दल चिटणीसास कळवाल तर सवडीप्रमाणें योग्य विचार करण्यांत येईल. या कार्यक्रमपत्रिकेंत प्रसंगानुसार फेरफार केला जाईल.

I. P. P.

श्री.

वि० वि० यंदाचे सालीं पर्जन्याचे आप्तीमुळे मुंबई इलाख्यांतील बहुतेक जिल्ह्यांत मोठा कहर गुदरल्यामुळें सर्व प्रजेचे अन्नपाण्यावांचून हाल होण्याचा प्रसंग येऊन ठेपला आहे, व कितीएक लोक आपलीं घरें दारें सोडून परागंदा होत आहेत. सबब त्यांचे बचावाकारितां वर्गणी जमवून त्यांस मदत करण्याचे हेतूनें सर्व लोकांची सभा भरविण्याविषयीं खालीं लिहिलेली सूचना आल्यावरून सदर्हूप्रमाणें तजवीज करण्याकारितां ता० १२ आक्टोबर सन १८७६ गुरुवार रोजीं सायंकाळीं पांच वाजतां रा० रा० नारायण चिंतामण फडतरे यांचे सदाशिव पेठेंतील वाड्यांत सभा भरविण्याचा विचार ठरला आहे, तरी आपण मेहेरबानगी करून सभेस आलें पाहिजे. कळावें लोभ असावा हे विनंती. तारीख १० आक्टोबर १८७६ इसवी.

शिवराम हरी साठे.
सेक्रेटरी सार्वजनिक सभा पुणें.

---

रा० रा० शिवराम हरी साठे,

सेक्रेटरी नि० सार्वजनिक सभा पुणें यांस -

खालीं सह्या करणारे गृहस्थांकडून लिहिण्यांत येतें कीं, यंदाचे सालीं पर्जन्याचे आक्षी-मुळें या सर्व इलाखाभर मोठा कहर गुदरला आहे, त्यांत मुख्यत्वें करून **माढें, करमाळें, पाटस, इंदापूर, भिमथडी, माळशिरस, पंढरपूर, सांगोलें,** तसेंच **नगर, धारवाड, खानदेश, सोलापूर, बेळगांव** व **कलादगी** व पटवर्धन मुलखापैकीं **सांगली, जमखिंडी** वगैरे पूर्वेकडील देशांत पर्जन्याचे आक्षीमुळें सर्व प्रजेचे **अन्नपाण्यावांचून फार हाल होण्याचा प्रसंग येऊन ठेपला आहे.** व कितीएक आपलीं घरें दारें सोडून परागंदा होत आहेत व आतां यापुढें पर्जन्य पडण्याचीं चिन्हें मुळींच दिसत नाहींत. हस्त नक्षत्राची आशा सर्वांस होती ती आलीकडे थंडी पडूं लागल्यामुळें नष्ट झाली आहे. सन १८७४ सालीं बंगाल्यांत जो कहर गुदरला तोच प्रसंग इकडे येऊन ठेपला आहे. ही गोष्ट सरकारांनीं मनांत आणून मेहेरबानगीनें कित्येक ठिकाणीं नवीन जुजबी कामें सुरू करून लोकांचा बचाव करण्याची तजवीज चालू केली आहे, परंतु तेवढ्या योगानें संकटांत पडलेल्या सर्व लोकांचा बचाव चांगले प्रकारें होईल असें दिसत नाहीं, व सरकारावर हा सर्व भार टाकणेंही योग्य नाहीं, सबब ज्या प्रांतांत सुबत्ता आहे त्या प्रांतांतील लोकांनीं व विशेषेंकरून पुण्यासारख्या मोठ्या शहरांतील लोकांनीं या कामीं पुढारीपणा घेऊन संकटांत पडलेल्या आपल्या देशबंधूंच्या बचावाकरतां वर्गणी जमवून स्वतंत्र रीतीनें लोकांची स्थिति सरकारास व इतर लोकांस कळविण्याकरतां मुद्दाम मनुष्य पाठवून बातमी आणविणें अवश्य आहे, व कोणते उपाय केल्यानें हा ताप कमी होईल, व कोणतीं कामें सरकारानीं सुरू केलीं पाहिजेत याजबद्दल आपल्या सार्वजनिक सभेनें व इतर शहरांतील लोकांनीं या बाबतींत विशेष काळजी बाळगिली पाहिजे. सबब या गोष्टीचा विचार करण्याकारितां शहरांतील व लष्करांतील सर्व लोकांची जाहीर सभा भरविण्याची तजवीज आपल्याकडून सत्वर व्हावी. कळावे हे विनंती.

पुणें, तारीख ७ माहे आक्टोबर सन १८७६ इसवी.

**श्रीनिवास शेषो हतिबेळगळकर.**
**चिंतामणराव हरी देशमुख.**
**गणपतराव विनायक सांगलीकर.**
**बळवंतराव विनायकशास्त्री पटवर्धन.**

गणपतराव दामोदर पानसे.
भाऊ मनसाराम नाईक.
हरी रावजी.
गणेश वासुदेव जोशी.
नारायण चिंतामण फडतरे.
महादेव मोरेश्वर कुंटे.
गोविंद महादेव गद्रे वकील.
कृष्णाजी विष्णु लिमये.
त्रिंबकराव नारायण राजमाचीकर.
कृष्णाजी त्रिंबक रानडे.
बळवंत रामचंद्र सहस्रबुद्धे.
विनायकराव रंगनाथ पुरंदरे.
दामोदर जनार्दन गोखले.
शिताराम विश्वनाथ पटवर्धन.
केशव पांडुरंग गडबोले.
गणेश दाजी गद्रे.
बळवंतराव अनंत देव.

पांडुरंग परशराम देशमुख.
नरहर बापूजी दामले.
सदाशिव त्रिंबक जोशी.
नारायण त्रिंबक देशमुख.
नबाबअल्ली मर्दाखान वल्लद नबाब हुसेन-अल्लीखान.
अबदुल तयब बदरुदीन.
जिवनजीभाई नूरभाई.
हरीभाई दत्तराम.
विजयरंगमअय्या मुदलीयार.
गंगाधरराव विश्वनाथ गोखले.
नारायण विनायक साठे.
महादेव रामचंद्र केळकर.
महादेव गोविंद रानडे.
राजन्नालिंगू.
बाळकृष्ण मनसाराम. New
गंगारामभाऊ म्हस्के.

श्री.

चि॰ वि॰ पुणें सार्वजनिक सभेचे नियमांतील क॰ १० प्रमाणें शके १८०० सालचे चैत्रमासची मोठी सभा पुढील रविवारीं ह्मणजे ता॰ १६ जून सन १८७८ इ॰ रोजीं तिसरे प्रहरीं चार वाजतां विश्रामबागे नजीक नगरकर यांच्या वाड्यांत भरणार आहे ते समयीं पुढील कामें होणें आहेत:—

१ श्री॰ रा॰ रा॰ बाळासाहेब कुरुंदवाडकर व या सभेचे उपाध्यक्ष रावसाहेब फडणीस येथें आले आहेत त्यांस पान सुपारीस बलाविलें आहे.

२. चैत्र शु॰ १ शके १७९९ लागाईत फाल्गुनमास शके मजकूर अखेर ह्मणजे ता॰ १५ मार्च सन १८७७ लागा॰ ता॰ २ एप्रिल सन १८७८ पर्यंत पुणें सार्वजनिक सभेच्या व्यव॰ मंडळीनें केलेल्या कामाचा रिपोर्ट व सदर मुदतींत सभेचे खजिनदार यांजकडून जमाखर्च झाल्याचें टिपण वाचण्यांत येईल.

३. चालू साला करितां व्य॰ स्था॰ मंडळी व सभेचे इतर अधिकारी नेमणें.

४. खेरीज किरकोळ काम असल्यास सादर केलें जाईल.

येणें प्रमाणें काम चालणार आहे करितां आपण सदरहू वेळेस वर लिहिलेल्या ठिकाणी अगत्य येण्याचें करावें.

ता॰ १५ जून सन १८७८ ई<br>जगद्हि॰ छाप॰ छापिलें.

शिवराम हरी साठे<br>सेक्रेटरी सार्वज॰ स॰ पुणें.

श्री.

विनंती विशेष. आपल्या महाराणी साहेब यांणीं हिंदुस्थानचे पातशाहिणीचा किताब घेतला. त्याबद्दल आनंद प्रदर्शित करण्याबद्दल मानपत्र देण्यासाठीं दरबार भरविण्याविशीं खालीं लिहिलेली सूचना सरदार व इतर गृहस्थांकडून आल्यावरून सदर्हू प्रमाणें तजवीज करण्याकरतां ता० २९ माहे मे १८७६ सोमवार रोजीं दिवसा बारावर पांच वाजतां भाऊ मनसाराम यांचे पेठ वेताळ येथील वाड्यांत दरबार भरविण्याचा विचार ठरला आहे. तरी आपण कृपा करून दरबारास आलें पाहिजे. कळावें लोभ करावा हे विनंती.

ता० २१ मे सन १८७६.

सदाशिव बल्लाळ गौंड्ये.

ऑनररी सेक्रेटरी पुणें सार्वजनिक सभा.

श्री.

राव बहादूर सदाशिव बल्लाळ गोंड्ये

पु० सा० सभेचे सेक्रेटरी यांसः—

आम्ही खालीं सह्या करणार आपल्यास विनंती करतों कीं, आपल्या महाराणी साहेबांनीं हिंदुस्थानची पातशाहीण म्हणून किताब घेतला आहे, त्याजबद्दल संतोष प्रदर्शक मानपत्र देण्याविशीं आपले सभेत ता० ३० माहे एप्रिल सन १८७६ रोजीं ठराव झाला आहे. त्याप्रमाणें तजवीज करण्याकरतां चीफ व सरदार व इतर लोकांची एक जाहिर सभा करण्याचा विचार जितका लौकर होईल तितका केला पाहिजे. कळावें.

ता० १९ माहे मे सन १८७६ इसवी.

**माधवराव मनोहर** खासनवीस व पोतनीस पहिले प्रतीचे सरदार.

**विश्वासराव भास्कर गोखले** दुसरे प्रतीचे सरदार.

**गणपतराव दामोदर पानसे** दुसरे प्रतीचे सरदार.

**महादाजी बाबुराव फडनवीस** दुसरे प्रतीचे सरदार.

**नारायणराव कोंडिरामसिंग** दुसरे प्रतीचे सरदार.

**रंगराव विनायक पुरंदरे** दुसरे प्रतीचे सरदार.

**खान बहादूर दस्तुर नसरवानजी जामापूसजी** पारशांचे गुरु.

**नबाबअल्ली मर्दाखान ओढेकर** तिसरे प्रतीचे सरदार आणि म्युनिसिपाल कमिशनर पुणें.

**हुसनजी जामापूसजी दस्तुर** म्युनिसिपाल कमिशनर पुणें.

**कृष्णाजी वासुदेव जोशी** वकील व सातारा सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी.

**भाऊ मनसाराम** म्युनिसिपाल कमिशनर.

**अबदुल तयब बदरुदीनशेट** बोहरी म्युनिसिपाल कमिशनर.

**माधवराव यशवंत रास्ते.**

**जीवनराव नारायण मुजुमदार** तिसरे प्रतीचे सरदार.

**आनंदराव केशव खासगीवाले** तिसरे प्रतीचे सरदार.

**गजाननराव सदाशिव दीक्षित पटवर्धन** तिसरे प्रतीचे सरदार.

**वामनराव माधव रायरीकर** तिसरे प्रतीचे सरदार.

**सदाशिवराव रघुनाथ जोशी मेडदेकर** इनामदार.

**भगवंतराव मल्हार पोतनीस** इनामदार.

**व्यंकटराव रामचंद्र** सरकारी वकील.

**कृष्णाजी त्रिंबक रानडे** ज्ञानप्रकाशाचे मालक व म्युनिसिपाल कमिशनर.

**हरी रावजी चिपळुणकर** म्युनिसिपाल कमिशनर पुणें.

**भाऊ गोविंद सापकर** ज्ञानचक्षूचे मालक.

**विठ्ठल सखाराम अग्निहोत्री** शिवाजी वर्तमानपत्राचे मालक.

**नानाभाई नरोत्तमदास सावकार.**

**गणेश वासुदेव जोशी** वकील आणि म्युनिसिपाल कमिशनर पुणें.

**दिनकर बल्लाळ चक्रदेव,** वकील व सेक्रेटरी सोलापूर सार्वजनिक सभा.

---

ज्ञानप्रकाश छापखाना पुणें.

The undersigned present compliments to ____________

________________________________________

and request the honour of his presence at the Town Hall (Heerabag) at 4-30 P. M. (Bombay Time) on Tuesday the 7th February 1882, where an address of welcome on behalf of the inhabitants of the city and station of Poona and of those of the Deccan generally will be presented to HIS HIGHNESS THE MAHARAJA OF TRAVANCORE by the Poona Sarvajanik Sabha.

*Dated 6th February 1882.*

S. H. SATHE.
S. H. CHIPLONKAR.
*Secretaries Sarvajanik Sabha.*

Dead letter office.
No. 3.0/1878

# Sarvajanik Sabha Rooms,

NAGARKAR'S WADA, NEAR VISHRAMBAG.

*Poona,* 28th July 1878.

To,

Rao Saheb Mukund Rao Bhaskar

Sub Judge Panwel

SIR,

I am directed by the Managing Committee of the Poona Sarvajanik Sabha to send to your address a copy of the first number of the Poona Sarvajanik Sabha Quarterly Journal. Should you be pleased to accept this as a subscriber, subsequent issues will be sent to you. It will be seen from the Notice that the annual subscription in advance is Rs. Four and the price of each single issue a Rupee and a half. The success of this undertaking depends solely upon the support of the public. It is humbly hoped therefore that you will kindly patronise the work yourself and secure its circulation among your friends

Yours obediently,

Shivram Hari Sath

*Secretary Poona Sarvajanik Sabha.*

*N. B.*—Gentlemen who will not send the accompanying signed within a fortnight after the receipt of the number will be understood to have become subscribers.

932

*The Sarvajanik Sabha Rooms.*

Poona 15-11-07.

5-12-6

SIR,

THE undersigned begs to announce that the record of the QUARTERLY JOURNAL of the Poona Sarvajanik Sabha having now been sifted and arranged, it has become possible to offer to the public more or less complete sets of the volumes of the said Journal. These volumes, it need hardly be stated, have a unique value as containing the correspondence of the Sarvajanik Sabha with Government and their individual officers, memorials and representations on many of the prominent subjects of public importance during the years 1878-1898, and articles specially written for the Sabha's Journal on various subjects, especially political and economic ones, by such eminent men as the late Mr. Justice M. G. Ranade and Mr. S. H. Chiplunkar, the Hon'ble Mr. G. K. Gokhale, Rao Bahadur G. V. Joshi B. A., Mr. B. G. Tilak and others who were at one time or another intimately connected with the Sabha. The total price of the nineteen volumes of the Journal would, at the indicated rate of subscription, amount to about eighty-five rupees. The Sabha, however, has decided to so lower the price of the volumes as to bring this vast amount of valuable political literature within the means of not only every public library, but also of every student of politics coming from the middle classes. It is, therefore, proposed to fix this price at from 20 to 25 rupees according to the number of the missing issues in the whole set. The undersigned would be glad to receive orders for the sets of the Journal, and he begs to point out that those who send orders promptly would naturally have a better chance of securing the more complete sets.

Yours &c.

N. C. KELKAR,

*Hon. Secretary,*

Poona Sarvajanik Sabha.

*Bombay, 4th October 1896.*

DEAR SIR,

I have the honour to inform you that there will shortly be published for purposes of historical record and reference a complete account of the proceedings (including press notices) in connection with the demonstrations held in honour of Mr. Dadabhai Naoroji during his last visit to India in December 1893. The price per copy is fixed at one Rupee just to cover the cost of the printing. I shall be glad to be informed on the accompanying reply post card the number of copies for which you will kindly subscribe.

I am,

Yours truly,

D. E. WACHA.

1896.

Dear Sir,

Referring to your Post Card about the account of Mr. Dadabhai Naoroji Demonstrations in 1893, I have to request you to send me cop of the same.

Yours truly,

*Address*


EAST INDIA POST CARD

THE ADDRESS ONLY TO BE WRITTEN ON THIS SIDE.

QUARTER ANNA

REPLY.

DINSHA EDULJI WACHA, Esq.,

APOLLO BUNDER, FORT,

BOMBAY.

श्री.

सार्वजनिक सभा आफिस, पुणें.

ता० ३० माहे जुलई सन १८९६.

वि० वि० स्वाकीनमध्यें होत असलेले लढाईशीं हिंदुस्थानचा अर्थाअर्थी संबंध नसतां हिंदुस्थानांतून तिकडे स्टेट सेक्रेटरीसाहेब यांनीं सैन्य पाठविलें व त्याजबद्दलचा खर्च हिंदुस्थानावरच लादण्याचा ठराव नामदार पार्लमेंट सभेनें केला आहे यामुळें हिंदुस्थानदेशावर मोठा जुलूम होत आहे, सबब गांवोगांवीं जलदी सभा भरवून दिलगिरी प्रदर्शित करणें अगदीं इष्ट आहे. पुण्यांत याजबद्दल ता० १९ माहे जुलई सन १८९६ रोजीं सर्व लोकांची जाहिरसभा भरून ठराव पास करण्यांत आले ते ता. २९।७।९६ चे जगतहितेच्छुमध्यें प्रसिद्ध झाले आहेत. व आपलेकडून होणारे ठराव ब्रिटिश कमिटी, नामदार पार्लमेंट सभा; ना० स्टेट सेक्रेटरीसाहेब व हिंदुस्थानसरकार यांजकडे पाठविण्यांत यावे, अगर इकडे पाठवावे ह्मणजे आह्मी ते पाठवून देऊं. तसदीची माफी व्हावी.

आपले तेथें देशी कापड व इतर देशी माल वगैरे वापरण्याबद्दलची चळवळ जारीनें सुरू ठेवून सवडीप्रमाणें इकडे कळविण्यांत यावें. या बाबतींत पूर्वी पत्रें पाठविलीं होतीं त्यांचीं उत्तरें कित्येकांकडून आलीं त्याजबद्दल आह्मी त्यांचे फार आभारी आहों. कळावें, हे विनंति.

विनायक रामचंद्र पटवर्धन,

चेअरमन, सार्वजनिक सभा, पुणें.

श्री

Office Copy

वि० त्रि०. **श्री० सयाजीराव महाराज गायकवाड सरकार सेनाखासखेल, समशेर बहादूर, फरजंदे खासे दौलत इंग्लिशिया** यांची स्वारी येथें आली असून पुणें सार्वजनिक सभेचें व इतर लोकांचें मानपत्र ता० २८ सप्टंबर १८८५ इतवी सोमवार रोजीं घेण्याचें त्यांणी कबूल केलें आहे. सदहू मानपत्र देण्याचा समारंभ सदहू तारखेस तिसरे प्रहरीं मद्रास ५॥ वाजतां **हिराबाग** (टाऊनहाल) येथें व्हावयाचा आहे. तरी सदहू समारंभास बरोबर ५ वाजतां येण्याची आपण मेहेरबानगी करावी. कळावें हे विनंती.

ता० २५ सप्टंबर सन १८८५ इसावी पुणें.

**शिवराम हरि साठे,**
**शिताराम हरि चिपळुणकर,**
सेक्रेटरी सार्वजनिक सभा पुणें.

☞ ही कार्ड बरोबर घेऊन येण्याची मेहेरबानी करावी.

श्री.

पुणें सार्वजनिक सभा-कचेरी.

ता. २८ फेब्रुवारी १९२१.

कृ. सा. न. वि. वि.

आपल्या सार्वजनिक सभेचा अर्धशतसांवत्सरिक उत्सव ठरल्या-प्रमाणें गेल्या चैत्र शु॥ प्रतिपदेपासून चार दिवस उत्साहानें पार पडला हें आपणास माहीतच आहे. सदर उत्सवानिमित्त ( १ ) व्याख्यान-समारंभ ( २ ) सर्व सभासदांचें व हितचिंतकांचें सम्मेलन ( ३ ) आज-पर्यंत सार्वजनिक सभेस भरभराटीस आणण्यास जे कारणीभूत झाले अशा सद्गृहस्थांच्या फोटोसह, विद्वान लेखकांकडून मुद्दाम लिहविलेल्या लेखांची एक मराठी व एक इंग्रजी पुस्तकें प्रसिद्ध करणें. इतकीं कार्यें केलीं गेलीं व त्यानिमित्त एकंदर खर्च सुमारें ( २३०० ) तेवीसशें रु. आला. त्यापैकीं वर्गणी, देणगी व पुस्तकविक्री इत्यादींच्या रूपानें सुमारें ( १३०० ) तेराशें रु. वसूल झाले. सुमारें ( १००० ) एक हजार रुपये वरील व्यवहारामध्यें तूट येत आहे हें आपणास दिसून येईलच. उत्सवाचा कार्यक्रम ठरवितांना खर्चाकरितां प्रत्येक सभासदाकडून निदान पांच रु. तरी मागावे असें ठरल्यावरून त्याप्रमाणें सर्व सभासदांकडे विनंतीपत्र पाठवून मागणी केली होती, परंतु फारच थोड्या सद्गृहस्थांनीं या विनंतीस मान दिला. आपल्याकडून ठरलेली ही वर्गणी न आल्यामुळें पुन्हां हें विनंतिपत्र आपणाकडे पाठवीत आहे. कळावें, लोभ असावा ही विनंति.

उत्सवमंडळाचे आज्ञेवरून

आपला

**ना. पु. कर्वे,**

चिटणीस उत्सवमंडळ.

चित्रशाळा प्रेस, पुणें.

श्री.

पुणें सार्वजनिक सभा
शुक्रवार पेठ, पुणें शहर.
ता. ७ फेब्रुवारी १९२०

कृ. सा. न. वि. वि.

लो. टिळक यानीं आपल्यास ता. २५ जानेवारी रोजीं पुणें सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाच्या खास जुबिली अंकाकरितां एक लेख लिहून पाठविण्याविषयीं विनंति केलीच आहे. हा खास अंक मार्च १५ तारखेस तरी तयार झाला पाहिजे हें मी सांगणें नकोच. साहजिकच या आठवड्यांत तरी छापखान्याकडे लेख पाठविणें जरूर आहे. तरी आपण आपला लेख या आठवड्यांत निदान पुढील आठवड्यांच्या आंत तरी पाठविण्याची कृपा करावी. तसदीची माफी असावी. कळावें, कृपा लोभ असावा ही विनंति.

आपला,
**नारायण पुरुषोत्तम कर्वे.**
चिटणीस खास अंक कमिटी.

चित्रशाळा प्रेस, पुणें सिटी

श्री

जोशी हॉल पुणें,
ता० १४।१२।९८.

वि० वि० विलायतेतील टेंपरन्स असोसियेशन्सचे सेक्रेटरी व अबकारी मासिक पुस्तकाचे एडिटर मे० फ्रेद्रिक ग्रब साहेब हे येथें आले आहेत. त्यांस उदईक ता०१५ माहे दिजेंबर सन १८९८ गुरुवार रोजीं सायंकाळीं मद्रास ४॥ वाजतां जोशी हॉल मध्यें पानसुपारीस बोलाविलें आहे. तरी आपण कृपाकरून सदर्हु ठिकाणीं बरोबर ४। वाजतां येण्याची मेहेरबानी करावी. कारण मे. ग्रब साहेब यांस दुसरीकडे जावयाचें आहे. कळावें हे विनंती.

आपले,

**विनायक रामचंद्र पटवर्धन**
चे. कांग्रेस कमेटी व सा. सभा
**लक्ष्मण रघुनाथ गोखले**
सेक्रेटरी. कांग्रेस कमेटी
**शिवराम महादेव परांजपे.**
**बाळकृष्ण रामचंद्र वैद्य.**
से. सा. स. पु.

॥ श्री ॥

सार्वजनिक सभा आफिस,
पुणें, ता० १।२।९६.

वि० वि० हिंदुस्थानांत तयार होणारे कापडावर जकात बसविण्याचा हिंदुस्थानसरकारचा निश्चय ठरल्यासारखें झालें आहे. ह्या जकातीमुळें गरीब लोकांवर फारच ओझें पडणार असून इकडील व्यापारास मोठा धक्का बसणार आहे. सबब सरकारचा हा विचार इकडील लोकांस अत्यंत नापसंत असल्याचें प्रसिद्ध करण्याकरितां आणि इकडे तयार होणारेंच कापड लोकांनीं वापरावें असा ठराव करण्याकरितां पुणेंशहरचे व लष्करचे लोकांची **जाहिरसभा** तारीख २ माहे फेब्रुवारी रविवार रोजीं सायंकाळीं मद्रास पांच वाजतां **बुधवारांत आनंदोद्भव थिएटरांत** सार्वजनिक सभेच्या मार्फत भरणार आहे. तरी आपण सभेस अगत्य यावें. कळावें, ही विनंति.

विनायक रामचंद्र पटवर्धन,
चेअरमन, सा० स० पुणें.

" आ० भू० प्रेस. "

श्री.

सार्वजनिक सभा, पुणें,

ता० १ माहे नोव्हेंबर सन १८९६.

वि० वि० आपलेकडून खालीं लिहिलेल्या प्रकारची माहिती सभेकडे आली असतां सभेकडून सरकारांत दुष्काळसंबंधानें वेळोवेळीं जावयाचे अर्जांत ती दाखल करण्यांत येईलः—

१. दुष्काळाचे संबंधानें सरकारानें आपलेकडे धान्याचीं दुकानें, रिलीफ ( मदत ) कामें वगैरे काढून कांहीं तजवीज केली आहे किंवा नाहीं. केली असल्यास कोणकोणते ठिकाणीं व कोणते प्रकारची.

२. सारा माफ करण्याबद्दल मे० कलेक्टरसाहेब यांजकडे आपले गांवांतून अर्ज गेले आहेत किंवा नाहीं गेले असल्यास किती अर्ज गेले आहेत.

३. आपले गांवात अगर तालुक्यांत धान्य पुरेसें आहे किंवा नाहीं. धान्याचा दर दोन महिन्यापूर्वी काय होता व आज काय आहे.

भाताचा, तांदुळाचा, गव्हाचा, बाजरीचा, ज्वारीचा, तुरीचा, हरबऱ्याचा, नागलीचा, वरीचा वगैरे.

४ गुरांस चारा पुरेसा आहे किंवा नाहीं नसल्यास काय तजवीज, करावी. सरकारी जंगलें मोफत देण्यांत आलीं आहेत किंवा नाहींत. कडब्याचा, गवताचा दोन महिन्यापूर्वीचा, व हल्लींचा दर कळविणें

५. रिलीफ कामें सरकारानें सुरू करणें जरूर आहे अगर सुरू केलीं आहेत. केलीं नसल्यास आवश्यकता किती आहे व किती लोक कामावर जाऊं शकतील.

६. लोकल फंड कमिटीकडून कामें सुरू आहेत किंवा नाहींत.

७. पाणी पुरेसें आहे किंवा नाहीं, नसल्यास काय तजवीज सरकारनें अगर लोकल फंड कमिटीनें केली असतां पाण्याची सोय होईल.

८. दुष्काळामुळें लोक गांव सोडून बाहेर किती गेले. लोकसंख्या पूर्वी किती होती व आतां किती आहे. हल्लीं जात आहेत किंवा नाहींत.

९. गुरें चारा नसल्यामुळें बाहेर गेलीं किती व मेलीं किती व हल्लीं आहेत किती. गुरांचा आजार आहे कीं काय.

१०. यंदाच्या रबीच्या व खरीपाचे पिकाचा अंदाज कळविणें

११. यंदां पाऊस अति पडल्यामुळें घरें पडून, देन्यासकट माती वाहून जाऊन वगैरेनें नुकसान झालें असल्यास कोणतें गांवांत किती, कोणते प्रकारचें नुकसान झालें तें कळविणें.

१२. आपले तेथील अधिकाऱ्यांनीं वरिष्ठ अधिकाऱ्याकडे दुष्काळचे संबंधानें रिपोर्ट कोणते प्रकारचा केला आहे, ह्मणजे दुष्काळ असल्याचें लिहून सारा माफ करण्याबद्दल व रिलीफ कामें सुरू करण्याबद्दल लिहिलें आहे किंवा नाहीं.

१३. दारूचा अगर ताडीचा व माडीचा दुष्काळामुळें कमी खप होत आहे किंवा नाहीं.

१४. घोडीं, गुरें, वगैरेच्या दोन महिन्यापूर्वींच्या व हल्लींच्या बाजारांत किमतीविषयीं कळविणें.

१५. अडाणी गरीब लोकांचे पैसे विनाकारण दारू पिण्यांत जातात ते न जावे व त्यांच्या शरीराची हानि न व्हावी व दुष्काळाच्या प्रसंगीं तरी ते पैसे त्यांच्या निर्वाहाच्या उपयोगी पडावें ह्मणून सरकाराकडे दारूचीं दुकानें निदान दुष्काळांत तरी बंद करण्याविषयीं आपलेकडून अर्ज गेले आहेत किंवा नाहीं तें कळविणें.

१६. गुरें वगैरे चरण्याकरितां रानें मोफत खुलीं करण्याकरितां व दुष्काळ फंडाच्या मदतीनें प्रसंगीं तोटा सोसून माफक दरानें धान्य विकण्याचीं दुकानें काढण्याकरितां व कालव्याचें पाणी तूर्त जिराईतास फुकट मिळण्याकरितां वगैरे अर्ज सरकाराकडे झाले असल्यास कळविणें.

१७. हिंदूंचीं अनाथ मुलें अन्नाकरितां ख्रिस्ती लोकांच्या हातीं पडूं नयेत ह्मणून आपलेकडे काय तजवीज झाली आहे ती कळविणें.

याहूनही कमजास्त माहिती जी खरी व विश्वसनीय असेल ती सभेकडे वरचेवर कळविली असतां ती सरकारांत कळविण्यांत येईल.

आपले

शिवराम महादेव परांजपे, एम. ए.
अच्युत सितारांम साठे, एम. ए.
सेक्रेटरी सार्वजनिक सभा,
दुष्काळ कमिटी, पुणें.

श्रीराम समर्थ

पुणें सार्वजनिक सभा-कचेरी

१७२३ शुक्रवार पेठ, पुणें शहर.

ता. २८ । २ ।१९३८.

कृ. सा. न. वि. वि.

आपल्या देशांतील लोकांची स्थिति सुधारण्याचे बाबतींत आजपर्यंत सरकार व लोक यांचें धोरण एक नव्हतें; किंबहुना तें परस्पर विरुद्धहि होतें. परंतु आतां प्रांतिक स्वायत्तता मिळाल्यामुळें, म्हणजे कांहीं मर्यादित स्वरूपांत प्रांताचा—लोकांचा कारभार करण्याचें काम लोकांकडे आल्यामुळें, सरकार व लोक यांच्यांतील हा विरोध नाहींसा व्हावा हें स्वाभाविक आहे. अर्थात् प्रांतांतील कारभाराचे बाबतींत आतां लोक हेच सरकार झालें असल्यामुळें त्यानें ठरविलेल्या कार्यक्रमांत त्यास मदत करणें म्हणजेच आपण आपला उद्धार करणें होय हें उघड आहे.

या दृष्टीनें हल्लीचे मुंबई सरकारनें खेडेगांवांच्या बाबतींत योजिलेल्या कामासंबंधानें आपणांशीं व आपल्या गांवांतील मंडळींशीं चर्चा करण्याकरितां व विचार विनिमयाकरितां मी आपल्या गांवीं तारीख २ । ३ ।१९३८ बुध वार रोजीं येणार आहे. याच दिवशीं केव्हांहि जाहीर सभा भरविण्याची तसदी घेण्याची कृपा करावी. शक्य तर आजुबाजूंच्या गांवांचे लोकहि सभेस बोलवावें. मी दौऱ्यावर असल्यामुळें मला पत्र मिळणार नाहीं. मी मात्र वर लिहिलेल्या दिवशीं बिनचूक येतों. तरी सभा भरविण्याची व्यवस्था अवश्य करावी. भरंवसा जाणून लिहिलें आहे. तसदी देत आहे, क्षमा करावी ही विनंति.

आपला

**सदाशिव विनायक बापट**

चिटणीस

पुणें सार्वजनिक सभा.

लोकसंग्रह, पुणें २.]

# ADDRESSES TO H. E. MARQUIS OF RIPON.

FROM

# THE BOMBAY PRESIDENCY.

PRESENTED THROUGH

# THE POONA SARVAJANIK SABHA.

ON

18th December 1884.

| NAMES OF DISTRICTS. | No. OF SIGNATURES. |
| --- | --- |
| | Total number of signatures. |
| Grand total of addresses. contained in 10 volumes. | Grand total of signatures. contained in 10 volumes. |

Volume No.

PRINTED AT THE "DNYAN PRAKASH" PRESS.
POONA.

॥ श्री ॥

**पुणें सार्वजनिक सभा-कचेरी**
१७२३ शुक्रवार, पुणें शहर.
तारीख ८।५।४०.

कृ. सा. न. वि. वि.

देशभक्त रा. **लक्ष्मण बळवंत** ऊर्फ **आण्णासाहेब भोपटकर** यांच्या वयाचीं साठ वर्षें संपून त्यांना वैशाख शुद्ध प्रतिपदा शके १८६२ बुधवार ( तारीख ८।५।१९४० ) रोजीं एकसष्ठावें वर्ष लागत आहे. रा. **आण्णासाहेब भोपटकर** यांनी राष्ट्रीय जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत गेलीं ३५ वर्षें जी विविध कामगिरी केली ती सुप्रसिद्धच आहे. पुणें सार्वजनिक सभेचे, प्रथम सामान्य सभासद, त्या नंतर चिटणीस व पुढें एक उपाध्यक्ष या नात्यांनीं त्यांनीं सभेची अनेक प्रकारें सेवा केली आहे; हें सर्व लक्षांत घेऊन महाराष्ट्रांतील या थोर पुढाऱ्याचा षष्ठ्यब्द-पूर्ति-समारंभ होणें अवश्य आहे.

पुणें सार्वजनिक सभेतर्फे सभेच्या दिवाणखान्यांत **तारीख १० मे १९४० शुक्रवारीं सकाळीं साडेआठ वाजतां** सभेचे सन्मान्य अध्यक्ष रा. नरसिंह चिंतामण केळकर यांचे हस्तें प्रथम रा. आण्णासाहेब भोपटकर यांच्या तैलचित्राचें अनावरण होऊन नंतर त्यांना मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यांत येणार आहे. सदर सुप्रसंगीं आपण अगत्य येण्याची कृपा करावी ही विनंति.

**महादेव धोंडो विद्वांस**
**सदाशिव विनायक बापट**
चिटणीस
पुणें सार्वजनिक सभा

The undersigned

request the pleasure of

Mr. ..............................................................................................

..............................................................................................................

company at a *Pan-Supari* party in honour of the Hon'ble Sir William Wedderburn Bart at the Town Hall ( Hirabg ) on Monday the 2nd May 1887 at 6 P. M. precisely.

S. H. CHIPLONKAR.

S. H. SATHE.

Poona 1st May 1887. *Secretaries P. S. Sabha.*

श्री.

विनंती विशेष. मेहेरबान सर वुइलियम वेडरबर्न बारोनेट, मुंबई सरकारचे चीफ सेक्रेटरी, यांची स्वारी आपले जागेचा राजीनामा देऊन येत्या शुक्रवारीं विलायतेस जाणार. त्यांची स्वारी उदईक येथें येणार आहे, व एक दिवस येथें राहून लागलीच मुंबईस जाणार आहे. ते जाण्यापूर्वीं त्यांची भेट व्हावी अशी येथील पुष्कळ लोकांची इच्छा आहे. सबब त्यांस उदईक ( ता० २ मे सन १८८७ सोमवार रोजीं ) सायंकाळीं ५॥ वाजतां हिराबागेंत पानसुपारी करितां बोलाविलें आहे. तरी सदहू प्रसंगीं आपण येण्याची मेहेरबानगी करावी. कळावें हे विनंती.

पुणें, ता० १।५।८७.

सिताराम हरि चिपळुणकर,
शिवराम हरि साठे,
सेक्रेटरी सार्वजनिक सभा पुणें.
नारायण भाई दांडेकर,
सेक्रेटरी फिमेल हायस्कूल.
गंगाराम भाऊ म्हसके,
सेक्रेटरी डे० असोशियेशन.
नारायण दामोदर योगी,
सेक्रेटरी पाठशाळा
व गायनसमाज.
कृष्णाजी रघुनाथ केळकर,
सेक्रेटरी नेटिव जनरल लायब्ररी.
वामन प्रभाकर भावे,
प्रि० ने० इ० पुणें.
कृष्णाजी वासुदेव जोशी,
प्रेसिडेंट लवादकोर्ट.
नारायण विष्णु आपटे,
सेक्रेटरी व्यापारी मंडळी पुणें.

' ज्ञानप्रकाश ' छापखाना पुणें.

IMPERIAL ASSEMBLAGE,

*Delhi, January 1st, 1877.*

**CARRIAGE TICKET for Spectators' Block.**

F. C. Daukes

*Secretary, Imperial Assemblage Committee.*

legibly written thereon

THE COMMISSIONER C. D.

Requests the Honour of

Mr Shivram Hari Sathe's

PRESENCE AT THE COUNCIL HALL POONA, TO MEET

**HIS EXCELLENCY THE VICEROY.**

At 2-30 P. M. on Friday the 19th November 1886.

*Sarvajanik Sabha, Poona,*

*presents compliments and requests the*

*pleasure of your company*

*at an Address*

*to be delivered by*

**Sjt. Nalini Ranjan Sarkar,**

*President National Chamber of Commerce, Calcutta*

*on Tuesday, the 24th September 1935 at 6 p. m.*

*in the Tilak Memorial Hall*

*on*

*" INDIA'S RURAL ECONOMY "*

Mr. N. C. KELKAR has kindly consented to preside.

*Poona*
*23-9-1935*

*D. V. Divekar*
*S. V. Bapat*
*Secretaries.*

[ Kesari Press, Poona. ]

[illegible]

श्री [illegible]

कारभारीमंडळ–सभा

**पुणें सार्वजनिक सभा–कचेरी**
सार्वजनिककाका–दिवाणखाना,
१७२३, शुक्रवार, पुणें २.
दिनांक ३१।८।१९५३

विनंति :—

'सभे' च्या कारभारीमंडळाची सभा बुधवार दिनांक २–९–१९५३ ला सायंकाळीं साडे सहा वाजतां 'सभे'च्या सार्वजनिककाका–दिवाणखान्यांत भरणार आहे. त्या वेळीं आपण येण्याची कृपा करावी.

सभेपुढील कामें :—

(१) दिनांक १०।८।५३ ला भरलेल्या 'सभे' च्या कारभारीमंडळाच्या बैठकीचा वृत्तान्त कायम करणें.
(२) वरील सभेंतील कामांचा निकाल निवेदन करणें.
(३) महाराष्ट्रांतील दुष्काळनिवारणार्थ पाटबंधारे निर्माण करण्याविषयीं सरकारास मागणी करण्याबद्दल विचार करणें.
(४) 'स्वदेशी' चा पुरस्कार करण्यासंबंधानें आपली कांहीं योजना असल्यास ती 'सभे' कडे पाठविण्याबद्दल कारभारी-मंडळाच्या सर्व सभासदांस विनंतिपत्र पाठविण्यांत आले होते. त्याप्रमाणें सदर योजनेच्या विषयाचा विचार करणें.
(५) 'सभे' च्या इमारत दुरुस्तीसंबंधानें विचार करणें.
(६) सातारा–जलमंदिरांतील चोरीच्या खटल्यांत कोर्टानें निर्दोषी म्हणून ठरविलेल्या श्री. आपटे प्रभृति सर्व आरोपींना करण्यांत आलेल्या भयंकर मारहाणीबद्दल चौकशी करून त्यांत अपराधी ठरतील त्या पोलीस अधिकाऱ्यांना शासन करण्याविषयीं सरकारास सूचना करणें.
(७) अध्यक्षांच्या परवानगीनें आयत्या वेळेच्या कामांचा विचार करणें.

**रघुनाथ बापूजी फडके**
**सदाशिव विनायक बापट**
चिटणीस, पुणें सार्वजनिक सभा.

॥ श्री ॥

# विनंति.

पुणें, ता. १।२।३७

कृ. सा. न. वि. वि.

बुधवार तारीख ३ माहे फेब्रुवारी सन १९३७ रोजीं दुपारीं ४॥ वाजतां दाणेआळींतील **सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत श्री. ल. ब. उर्फ आण्णासाहेब भोपटकर व सौ. सुभद्राबाई तारकुंडे** यांच्या निवडणुकीच्या कार्याचा विचार करण्यांकरितां खासगी सभा आहे. तरी आपण त्यावेळीं अवश्य यावें अशी विनंति आहे.

क. लो. अ. हे विनंति.

आपला,

**नरसिंह चिंतामण केळकर.**

माधव प्रेस, पुणें.]

श्री. सदाशिवरावजी बापट

पुणे.

पुणें सार्वजनिक सभा.

कारभारी मंडळाची सभा.

ता. २-९-१९५२.

मंजूर झालेले ठराव.

ठराव २.

सातारा जलमंदीरांतील चोरीच्या खटल्या बाबत सरकारास विनंति.

सातारा जलमंदिरांतील चोरीचा खटला खळबळ जनक होता. अितकेच नव्हे तर खटल्याच्या न्यायालयांतील चौकशींत 'आरोपींनी' आपणांस पोलिसांनीं केलेल्या निर्दय व भयंकर मारहाणीस धीटपणे वाचा फोडली या संबंधाचे जे अहवाल वृत्तपत्रांत प्रसिध्द झाले आहेत ते वाचून प्रत्येक नागरिकास अत्यंत खेद वाटल्या वाचून रहाणार नाहीं. सदर खटल्यांतील आरोपीवर आरोप ठेवण्या अितकासुध्दां पुरावा पुढें न आल्यामुळें न्यायाधिशांनीं सर्व आरोपितांना दोषमुक्त सोडून दिले. खटल्याच्या या निकालानें न्यायाची चाड व अभिमान असणाऱ्या सर्वांना समाधानच वाटलें. तथापि या खटल्यांत पोलिसांनीं आरोपींना केलेल्या मारहाणीची निःपक्षपातीपणानें चौकशी होअून ज्यांच्या हातून हे मारहाणीचे अनुचित व निषेधार्ह प्रकार घडल्याचे खात्रीलायक सिध्द होअील त्यांना योग्य शासन देणे जरूर आहे. हें झाले नाहीं तर जनतेत पोलीस दलाबद्दलचा अभिमान व आदर कमी होअील. अर्थात अशी परिस्थिती निर्माण होणे ठीक नाहीं. तरी सरकारानें या प्रकरणी न्याय खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमून तिचा अहवाल प्रसिध्द करावा व

ज्या पोलीस अधिकाऱ्यांच्या हातून हे अनुचित व अमानुष प्रकार घडले असें सिध्द होईल त्यांना कडक शासन करावें असें ~~ह्या~~ या सभेचे सरकारास सांगणे आहे.

-------



श्री

## पुणें सार्वजनिक सभा-कचेरी

१७२३, शुक्रवार, पुणें २

दिनांक १९।७।१९५३

BA LLB Advocate
Wakanis Building
Girgaum Bombay 4

सादर सा० नमस्कार, विनंति विशेष—

कै० **सार्वजनिक काकांची** पुण्यतिथि **दिनांक** २९।७।१९५३ **बुधवार** रोजी, नेहेमीप्रमाणें, पुणें सार्वजनिक सभेच्या विद्यमानें साजरी होणार आहे. सार्वजनिक काका हे महाराष्ट्रांतच नव्हे तर अखिल भारतांत स्वदेशीचे पहिले प्रवर्तक म्हणून समजले जातात. ही गोष्ट लक्षांत घेऊन या पुण्यतिथीच्या दिवशीं महाराष्ट्रांतील स्वदेशी कारखानदार व व्यापारी यांची एक बैठक भरवून स्वदेशीच्या प्रश्नास चालना देण्याचा विचार करावा असें 'सभेनें' योजिलें आहे. सध्यां स्वदेशीची पुष्कळ पीछेहाट झालेली आहे, व त्याचा परिणाम स्वदेशी उद्योगधंद्यावर व व्यापारावर होत आहे. आज देशामध्यें बेकारी एक सारखी वाढत आहे. या बेकारीवर एक जालीम उपाय देशामधील उद्योगधंदे वाढणें हा सर्व संमत समजला जातो. उद्योगधंद्याची वाढ होण्यास लोकांमध्यें स्वदेशीची पुन्हां मोठी जागृति करण्याची जरुरी उत्पन्न झाली आहे. ही जागृति करतांना स्वदेशी माल उत्पन्न करण्याची व खपविण्याची मुख्य अडचण मार्गांत उभी राहते. म्हणून महाराष्ट्रांतील कारखानदारांनीं, व्यापाऱ्यांनीं व स्वदेशीच्या अभिमान्यांनीं हा प्रश्न पुन्हां कसा जोमांत पुढें न्यावा याचा विचार केला पाहिजे. त्यासाठीं योग्य प्रसंग म्हणजे कै. सार्वजनिक काकांच्या पुण्यतिथीचा दिवस आहे असें सभेस वाटते.

भारतांत जे दरिद्री प्रांत आहेत त्यांत महाराष्ट्राची गणना होते. महाराष्ट्रांतील हे दारिद्र्य महाराष्ट्रांत उद्योगधंदे उभे राहिल्याशिवाय व जोरावल्याशिवाय दूर होणें फार कठीण आहे. आपण सूज्ञ महाराष्ट्रीय बंधू ही गोष्ट चांगली जाणताच. स्वदेशीची महाराष्ट्रास गेली ८०–८५ वर्षें पूर्ण ओळख आहे. सध्या तिला मलीन स्वरूप प्राप्त झालें आहे; तें दूर करण्याचा प्रयत्न '**सभा**' करूं इच्छिते. आपण या बैठकीस उपस्थित होऊन 'सभेच्या' या औद्योगिक सेवेच्या कार्यांत मदत करावी अशी विनंति आहे. ही बैठक **दिनांक २९ जुलै १९५३ बुधवार रोजी लो० टिळक–मंदिरांत दुपारीं २ ते ५-३०** 'सभेचे' उपाध्यक्ष श्री. **तात्यासाहेब करंदीकर**, महाराष्ट्रांतील सन्माननीय अर्थशास्त्रज्ञ व स्वदेशीचे कट्टे अभिमानी, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार आहे. तरी या बैठकीस **आपण अवश्य येण्याची कृपा करावी.**

**बैठकीनंतर टिळक–मंदिरांतच सायंकाळीं साडे सहा वाजतां श्री. ज. स. करंदीकर** यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. **शिवराम लक्ष्मण करंदीकर** एम्. ए., एल्एल्. बी. यांचें '**स्वदेशी**' वर जाहीर भाषण होणार आहे. त्या वेळींहि आपण उपस्थित असावें अशी विनंति आहे.

**उत्तरीं आपली मान्यता कळवाल अशी उमेद आहे.**

कळावें, कृपा लोभ असावा ही विनंति.

आपले नम्र
**रघुनाथ बापूजी फडके**
**सदाशिव विनायक बापट**
**चिटणीस,**
पुणें सार्वजनिक सभा

पुणें सार्वजनिक सभा.

कारभारी मंडळाची सभा.

तारीख २-९-१९५३.

मंजूर झालेले ठराव.

ठराव १.

महाराष्ट्रांतील दुष्काळ निवारणार्थ पाटबंधारे त्वकर निर्माण करण्या-विषयीं सरकारास सूचना.

स्वतंत्र भारताची आर्थिक व औद्योगिक अुन्नति व्हावी व प्रजेचे सुख वाढावे या दृष्टीनें राज्कर्त्यांनीं योजलेल्या अनेक अुपक्रमांत पंचवार्षिक योजनेचा अुपक्रम प्रमुख गणला जातो. भारत हा कृषीप्रधान देश या दृष्टीनें शेती व अन्नधान्य अुत्पादन यांची अुर्जिताअवस्था करणे हाच मोठा जिव्हाळ्याचा व तातडीचा प्रश्न आहे. अवर्षण व दुष्काळ यांवर महत्वाचा अुपाय म्हणजे देशांतील पाटबंधारे वाढवणे हा होय.

महाराष्ट्रांत पाटबंधारे जवळ जवळ नाहींतच पण सह्याद्रीच्या खोर्‍यांत पडणारा पाण्याचा साठा पाट बंधार्‍याच्या योजनेने अुपयोगांत आणला तर अवर्षण व दुष्काळ यांचे पासून महाराष्ट्राचे बरेचसे संरक्षण होअील, याच दृष्टीनें पंच वार्षिक योजनेतील महाराष्ट्रांतील पाट बंधार्‍यांना पहिले महत्व देअून त्यांची अंमल बजावणी करणे हें अत्यंत जरूर आहे. कोयना, मुळा, कुकडी, गिरणा हे नवे पाट बंधारे तयार झाल्यास व हल्लीं असलेल्या धरणांतून नवीन कालवे काढणेची योजना केल्यास महाराष्ट्रांतील शेती व अन्न धान्य अुत्पादन यांची प्रगति होअील यांत संदेश नाहीं. मुंबअी प्रदेश सरकारनें पाट बंधारे व धरणे यांचे महत्व

ओळखून आपल्या कार्यक्रमांत त्यांना अग्रस्थान देवून अेकामागून अेक अशा पांचही योजना हातीं घेअून त्या पार पाडण्याचा निश्चय करावा व मध्यवर्ती सरकारास त्याकामीं जरूर तें सहाय करण्यास भाग पाडावें केवळ दीर्घ सूत्रीपणा अगर बेफिकिरी हल्लींच्या परिस्थितींत तरी अुपयोगाची नाहीं. लोकहितकारी म्हणवणाऱ्या सरकारनें तरी या गोष्टीची आंच व कळकळ बाळगली पाहिजे असें या सभेचें मत आहे.

-------

जावक क्रमांक ८२९

पुणें सार्वजनिक सभा-कचेरी,
सार्वजनिककाका-दिवाणखाना,
१७२३, शुक्रवार पेठ, पुणें शहर.
दिनांक ४ । ९ । १९५३.

श्री. रा. रा. सेक्रेटरी, पंत प्रधान, मुंबअी सरकार,
पुणें कौन्सिल हॉल यांसी.

कृ. सा. न. विनंति विशेष:-

सभेच्या कारभारी मंडळाची बैठक दिनांक २-९-१९५३ ला भरली होती. त्या सभेंत सर्वानुमतें मंजूर झालेले दोन ठराव सोबत पाठविले आहेत. त्यांचा सहानुभूतीनें विचार होअून त्या संबंधानें सरकार काय करूं अिच्छिते तें कळविण्याची कृपा व्हावी ही विनंति.

आपला नम्र,

चिटणीस,
पुणें सार्वजनिक सभा.